cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ०३ अंक–३४६ शुक्रवार दि.२९ मार्च २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 ▪ पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### इप्सित साध्य करण्यासाठी धडपड

केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपाच्या हाती सगळ्या यंत्रणा आहेत आणि या सगळ्याच यंत्रणा सरकारच्या तालावर नाचतात, हे स्पष्ट आहे. सध्या देशातील राजकीय आणि सामाजिक वातावरण अत्यंत कलुषित बनले आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरू आहे. सत्ताधारी भाजपचा एकही नेता ईडीच्या रडारवर आलेला नाही आणि त्याचवेळी रडारवर असलेले अनेक विरोधी पक्षनेते भाजपच्या मांडवात आल्यावर ईडीच्या कारवायांपासून सुरक्षित झाले आहेत. विरोधी पक्षांच्या नेत्यांवर सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून कारवाई होत असेल तर ही वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने सुरू असल्याचे द्योतक नव्हे काय?

### जळगाव जिल्ह्यात सरासरी तापमान ४४ अंशावर

जळगाव : जळगाव जिल्हा हा ज्याप्रमाणे केळी व कापूस या पिकांसाठी ओळखला जातो. त्याचप्रमाणे तो तापमानासाठीही संपूर्ण देशात ओळखला जातो. गुरूवार (दि. २८) रोजी जिल्ह्याचे सरासरी तापमान ४४ अंश सेल्सिअस वर पोहचल्याचे दिसले.

जिल्ह्यात जळगाव शहराचे ४२.८ तर भुसावळचे ४३.८ अंश सेल्सिअस तापमानाची वेलनेस वेदर याच्याकडून मिळालेल्या माहितनुसार नोंद झालेली आहे. तर शासकीय ममुराबाद येथील हवामान शाळेने दिलेल्या तापमानानुसार ४१.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

## नागपूर–गोवा शक्तिपीठ महामार्गाला रोखण्यासाठी शेतकरी आणखी तीव्र आंदोलन करणार

# सांगली जिल्ह्यातील पाच हजार शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार

**पुणे । प्रतिनिधी**

**नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी तासगाव, मिरज, कवठेमहांकाळ येथील पाच हजार शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने ७ मार्चला अधिसूचना काढली आहे. त्यात बाधित शेतकऱ्यांच्या हरकती व आक्षेप २१ दिवसात द्यावेत, असे म्हटले आहे. त्यानुसार अनेक शेतकरी वैयक्तिकही हरकती नोंदवत आहेत. यासाठी आता शक्तिपीठ महामार्गाविरोधात सांगलीत ८ एप्रिलपासून धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.**

### बांधकाम विभागाने अधिसूचना काढली, ८ एप्रिलपासून धरणे आंदोलन




शक्तिपीठ महामार्गाविरोधात शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी येत्या आठ एप्रिलला सांगलीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात संपूर्ण सांगली जिल्ह्यातील बाधित शेतकरी सहभागी होणार आहेत. त्यानंतर आंदोलनाची टप्प्याटप्प्याने तीव्रता वाढवली जाईल, अशी माहिती किसान सभेचे राज्य अध्यक्ष उमेश देशमुख यांनी दिली. सक्तीने भूसंपादनाविरोधात सांगलीवाडी, सांगली, पद्माळे, कर्नाळ, कवलापूर येथील दोनशेंवर शेतकऱ्यांनी हरकती दाखल केल्या. त्याआधी कवलापूरच्या दोनशेंवर शेतकऱ्यांनी सामूहिकपणे हरकती दाखल केल्या होत्या. ◄◄ पान २ वर

### जमिनी गेल्या तर आम्ही कुठे जावे ?

जगण्याचे प्रमुख एकमेव साधन असलेल्या बागायती जमिनींमधून महामार्ग गेल्याने आम्ही संपूर्ण उद्ध्वस्त होणार आहोत. आधीच एकराच्या जमिनी गुंठ्यावर आल्या आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे भूमिहीन होणार आहेत. अशावेळी आम्ही कुठे जाणार असा प्रश्न शेतकरी विचारत असून, या महामार्गाला सगळीकडील शेतकऱ्यांचा विरोध होताना दिसत आहे.

## मनरेगाच्या मजुरीत १० टक्क्यापर्यंत वाढ

### निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकारचा निर्णय



**पुणे । प्रतिनिधी**

**देशात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून सत्ताधाऱ्यांसह विरोधकही निवडणूक प्रचाराला लागले आहेत. यादरम्यान केंद्र सरकराने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांच्या संदर्भात मोठी घोषणा केली आहे. मनरेगा अंतर्गत मजुरांच्या मजुरीत ३ ते १० टक्के वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यामुळे मनरेगा मजूरांना पूर्वीपेक्षा जास्त मजुरी मिळणार आहेत. गुरुवारी (दि.२८) सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. मात्र, ही वाढ १ एप्रिलपासून लागू होणार आहे.**

मनरेगा अंतर्गत मजुरीतील ही वाढ प्रचलित दराच्या १०.५६ टक्के आहे. तर सर्वाधिक कमी वाढ उत्तराखंडमधील ◄◄ पान २ वर

# बीड जिल्ह्यात सामाजिक सलोख जपा, तिसरी अदृश्य शक्ती सक्रीय?

## न्याय सगळ्यांना समान हवा, एकाला विरोध अन् दुसऱ्यांचे स्वागत हे नको!

**विशेष प्रतिनिधी । बीड**

**भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे या प्रचारार्थ गावागावात जात असताना मराठा समाजाचा रोष त्यांना पत्करावा लागत आहे. बीड आणि केज तालुक्यामध्ये घोषणाबाजी करुन त्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले. दुसरीकडे बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये इतर तीन संभाव्य उमेदवार मात्र राजरोसपणे प्रचार करताना दिसत आहेत. एकास विरोध आणि दुसऱ्याचे स्वागत हा प्रकार नेमका रोषातून होत आहे की या पाठीमागे तिसऱ्याच कोणाचा तरी हात**







**आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोख्याचा प्रश्न निर्माण व्हावा म्हणून तिसरी अदृश्य शक्ती सक्रीय तर झाली नाही ना? अशी शंकाही सामान्य नागरीकांच्या मनात येत आहे. जिल्ह्यात सामाजिक सलोखा जपण्याची गरज असून मराठा समाजातील तरूणांनी पुढे येऊन यासाठी काही तरी करण्याची गरज आहे.**

भाजपकडून पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी पाथर्डी मार्गे धामणगाव येथून बीड जिल्ह्यामध्ये प्रवेश केला. जागोजागी त्यांचे जंगी स्वागत ◄◄ पान २ वर

### मराठा नेत्यांनी पुढे येण्याची आज खरी गरज

बीड लोकसभा मतदार संघात जो प्रकार सुरु आहे, तो सामाजिक संतुलन बिघडवणारा आहे. बीड जिल्ह्याला हे कधीही परवडणारे नाही. बीड जिल्ह्याने कधीही जातीय राजकारणाला खतपाणी घातले नाही. त्यामुळे यावेळी लोकसभा निवडणुकीत जो प्रकार सुरु आहे, तो कधीही बीड जिल्ह्यासाठी फायदेशिर नाही. त्यामुळे मराठा समाजातील सर्व पक्षीय नेत्यांनी पुढे येऊन मराठा समाजातील बांधवांना जातीवाद विरहीत लोकसभा निवडणुक व्हावी यासाठी आवाहन करण्याची गरज आहे. त्यासाठी पुढे येऊन गावागावात बैठका घेऊन समाजातील तरुणांना संयम ठेवण्याबाबत सांगण्याची आज खरी गरज असल्याचे म्हटले जात आहे.

## जुलै, सप्टेंबरमध्ये भारतात चांगला पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाच्या मान्सून हंगामामध्ये प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थिती निवळून 'ला–निना' स्थिती तयार होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे यंदा पावसाळ्यात विशेषतः जुलै ते सप्टेंबर या कालावधीमध्ये भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आशिया – पॅसिफिक इकॉनॉमिक को –ऑपरेशनच्या (अपेक) हवामान केंद्राने वर्तविला आहे. 'अपेक'च्या हवामान केंद्राने भारतातील मान्सूनचा यंदाचा पहिल्या अंदाज वर्तवला आहे. मॉन्सूनच्या हंगामात विशेषतः जुलै ते सप्टेंबर या कालावधीत भारतात सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान होण्याची शक्यता आहे.

## सकल मराठा समाज भुजबळांविरोधात देणार उमेदवार

**नाशिक । वृतसंस्था**

नाशिकची जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाला मिळणार हे जवळपास निश्चित झाले आहे. नाशिकमधून मंत्री छगन भुजबळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. मात्र मराठा समाजाची नाराजी भुजबळांवर असल्या कारणाने भुजबळांविरोधात मराठा उमेदवार देण्याचा निर्णय सकल मराठा समाजाने घेतला आहे.

एकीकडे शिवसेना आणि भाजपची नाशिकच्या जागेवर जुंपली असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या छगन भुजबळ यांनी बाजी मारल्याचे चित्र आहे. छगन भुजबळ यांनी पुतण्या समीर भुजबळ किंवा आपल्याला उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसने साताऱ्यातील जागेचा दावा सोडला. मात्र त्याबदल्यात नाशिकची जागा राष्ट्रवादीला मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकला ◄◄ पान २ वर

## काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र रद्द

**नागपूर । प्रतिनिधी**

रामटेक लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या उमेदवार रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीत रद्द करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या ऐवजी त्यांचे पती यांना काँग्रेसकडून उमेदवारी जाहिर करण्यात येणार आहे. मात्र रश्मी बर्वे यांचे जातप्रमाणपत्र रद्द झाल्याच्या घटनेवरून विरोधी पक्षनेते

### विजय वडेट्टीवार यांचे भाजपावर टीकास्त्र

विजय वडेट्टीवार यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, रामटेक लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या उमेदवार रश्मी बर्वे यांचे या निवडणुकीत पारडे जड आहे. त्यामुळेच त्यांच्या विरोधात साम– दाम –दंड– भेद सूत्राचा वापर भाजपाने सुरू केला. लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या देशाच्या लोकसभा निवडणुकीत सरकारी यंत्रणांचे निःपक्ष वागणे अपेक्षित असताना यंत्रणा याविरुद्ध आचरण करत आहे. ◄◄ पान २ वर

## शरद पवारांचा मास्टर स्ट्रोक; जयदत्त क्षीरसागर आघाडीचे उमेदवार?

### माजलगाव तालुक्यात भेटीगाठीला सुरुवात; लवकरच होणार घोषणा



**बीड । प्रतिनिधी**

भाजप कडून पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहीर होऊन आठवडा झाला तरी महाविकास आघाडी कडून अजूनही बीड लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. बजरंग सोनवणे, ज्योतीताई मेटे यांची नावे आघाडीवर असली तरी शरद पवारांकडून पंकजा मुंडे यांना मास्टर स्ट्रोक दिला जाऊ शकतो, असे म्हटले जात असून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचीही उमेदवारी ऐनवेळी जाहीर केली जाऊ शकते अशी चर्चा आहे.

बीड लोकसभा मतदारसंघाकडे संपूर्ण राज्याचे सध्या लक्ष लागले आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिल्यामुळे त्यांचा विजय एकतर्फी होतो की काही वेगळा धक्कादायक निकाल लागतो, याविषयी सुद्धा सध्या संपूर्ण जिल्हाभर तर्क वितर्क सुरू आहेत. पंकजा मुंडे यांना बीड जिल्ह्यामध्ये तगडे आव्हान देण्यासाठी शरद पवार यांनी जोरदार फिल्डिंग लावली असून महायुतीच्या गोटातील बजरंग सोनवणे यांना महाविकास आघाडी मध्ये घेतले आहे. तर ज्योतीताई मेटे ◄◄ पान २ वर

## जलजीवन मिशनमधील सहाय्य संस्थांना राज्य स्तरावरून ब्रेक

**बीड । प्रतिनिधी**

जलजीवन मिशनमध्ये काम करणाऱ्या साह्यकारी संस्थांना राज्यस्तरावर ब्रेक देण्यात येत असून, त्यांचा कार्यकाल ३१ मार्च रोजी पूर्ण होत आहे. राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांना अवगत केल्याशिवाय या संस्थांना पुनर्नियुक्ती किंवा त्यांच्यासोबत करार करण्यात येऊ नये, अशा स्पष्ट सूचना अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते यांनी जीपच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

बीड जिल्ह्यात नेमण्यात आलेल्या अंमलबजावणी सहाय्य संस्थांच्या विरोधात अनेक तक्रारी आहेत. सरपंचांना पैशाची मागणी करणे, आराखडे तयार करण्याची जबाबदारी संस्थांची असतानाही यासाठीही पैसे मागणे, अशा काही तक्रारी राज्य स्तरावर करण्यात आलेल्या आहेत. वास्तविक पाहता आराखडे तयार करणे, या कामावर लक्ष ठेवणे, देखभाल करणे, काम पूर्ण झाल्याची खात्री करून घेणे या सर्व बाबींची जबाबदारी या संस्थांची आहे. यासाठीच शासन पैसे मोजते तरीही या संस्था आपली जबाबदारी विसरून सरपंचांना पैशाची मागणी करत असल्याने त्यांच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारीची दखल घेऊन या संस्थांना पुन्हा नियुक्त देऊ नये, असे राज्य शासनाने बजावले आहे.

या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, जलजीवन ◄◄ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२८ मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ३९.०० क्विंटल | | |
| २,२०० | २,८१० | २,४३८ |
| ज्वारी/हायब्रिड :२२०.५० क्विंटल | | |
| १,६५१ | ३,३४० | २,४३१ |
| मूग :०.५० क्विंटल | | |
| ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ४.५० क्विंटल | | |
| ९,६५० | ९,६५० | ९,६५० |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ६.५० क्विंटल | | |
| २,१५० | २,५८१ | २,३६५ |
| चिंचोका/लोकल: ३.०० क्विंटल | | |
| २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन:२२.०० क्विंटल | | |
| ४,३५० | ४,४७५ | ४,३९५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | | |
| ४,८५१ | ४,८५१ | ४,८५१ |

# बीडच्या गटविकास अधिकाऱ्यांचे वरातीमागून घोडे

## काम झाले २०२३ मध्ये आणि ठराव मागतात २०२४ मध्ये

**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील काही गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट चे काम करण्यात आले. प्रत्येक गावामध्ये जवळपास सहा ठिकाणी स्त्रोत चार्ज करण्यासाठी बोअर करण्यात आले. मात्र हे बोअर सन २०२३ च्या मार्चमध्ये घेण्यात आले. याचवेळी यासंदर्भात ग्रामपंचायतीकडून ठराव घेणे आवश्यक होते. मात्र, तसे न करता केवळ थातूरमातूर काम करून या संस्था मोकळ्या झाल्या. आता या संस्थांना बिले काढण्यासाठी ठरावाची आवश्यकता असून या संस्थांच्या पैशासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित ग्रामसेवकांच्या व्हाट्सअप ग्रुप वर सूचना टाकून कामाची मागणी, काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आणि हस्तांतरण असे सर्वच ठराव एकाच वेळी मागितले आहेत. मागच्या वर्षी काम सुरू होण्यापूर्वी कामाची मागणी करणारा ठराव घेणे आवश्यक असताना असे न करता आता हे सर्व ठराव ग्रामसेवक आणि सरपंचांनी द्यावेत असे पत्र देण्यात आले आहे.**



गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसेवकांच्या ग्रुप वर सोमवार पर्यंत तात्काळ हे सर्व कागदपत्रे जमा करा, असा दमच भरला असून गटविकास अधिकाऱ्यांच्या आणि सह्याद्री कन्स्ट्रक्शन या संस्थेचे काय साटेलोटे आहे. याबाबत सरपंच आणि ग्रामसेवकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे. सन २०२२ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी जळगाव येथील सह्याद्री कन्स्ट्रक्शन ला याचे काम दिले होते. मार्च २०२३ मध्ये हे काम पूर्ण करायचे होते. मात्र काम पूर्ण करण्यापूर्वीच संबंधित ग्रामपंचायतीकडून ठराव प्राप्त झाल्यानंतरच हे काम सुरू करावे असे स्पष्टपणे ◄◄ पान २ वर

### तगादा लावूनही ठराव मिळाले नाहीत– पांचाळ

या संस्थेचे भु– वैज्ञानिक पांचाळ यांनी यासंदर्भात सांगितले की आम्हाला कामे पूर्ण करायची घाई होती. एकदा मशनरी आली की सर्व कामे लवकर पूर्ण व्हावी असा आमचा हेतू होता. या गडबडीत आम्ही सरपंचांना अनेक वेळा ठराव मागितले. मात्र आज देतो, उद्या देतो असे म्हणून आम्हाला ठराव दिले नाही. आता आम्हाला आवश्यकता असल्याने आम्ही आता तगादा करत आहोत. बीड तालुक्यातील ३२ गावांमध्ये हे काम करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

cmyk

अग्रलेख

# इप्सित साध्य करण्यासाठी धडपड

केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपाच्या हाती सगळ्या यंत्रणा आहेत आणि या सगळ्याच यंत्रणा सरकारच्या तालावर नाचतात, हे स्पष्ट आहे. सध्या देशातील राजकीय आणि सामाजिक वातावरण अत्यंत कलुषित बनले आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरू आहे. सत्ताधारी भाजपचा एकही नेता ईडीच्या रडारवर आलेला नाही आणि त्याचवेळी रडारवर असलेले अनेक विरोधी पक्षनेते भाजपच्या मांडवात आल्यावर ईडीच्या कारवायांपासून सुरक्षित झाले आहेत. विरोधी पक्षांच्या नेत्यांवर सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून कारवाई होत असेल तर ही वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने सुरू असल्याचे द्योतक नव्हे काय?

मोदी सरकार पुन्हा सत्तेवर आले तर पुन्हा निवडणुका होतील की नाही याची खात्री नाही अशी भीती व्यक्त केली जात आहे. निवडणुका झाल्याच तर रशियासारख्या होतील असेही म्हटले जात आहे. 'अब की बार चार सौ पार' या विचाराने भाजप पछाडला गेला आहे. आपले इप्सित साध्य करण्यासाठी त्याची धडपड सुरू आहे. विरोधकांवर आरोप करून त्यांना तुरुंगात डांबले जात आहे. परंतु यातून विरोधकांचे सुद्धा प्रतिमासंवर्धन होत आहे याचे भान सत्ताधाऱ्यांना राहिले नसावे. जर केजरीवाल यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण झाली तर मिळणाऱ्या जागाही गमवाव्या लागतील हा विचार भाजपने केला नसावा. यामागचे कारण भाजपच्या लक्षात आले असेल पण त्याला आता उशीर झाला असेच म्हणावे लागेल. विरोधकांना दबावाखाली ठेवायचे, त्यांचे मानसिक खच्चीकरण करायचे, विचारसरणी बदलायला लावायची, छोट्या-मोठ्या प्रादेशिक पक्षांवर ताबा मिळवायचा हीच भाजपची नीती, रणनीती राहिली आहे. कसेही आणि काहीही करून निवडणुका जिंकायच्या ही 'अब की बार चार सौ पार'मागची संकल्पना आहे. भाजप सरकारच्या दशकभराच्या कालावधीत ईडीने १२१ मोठ्या राजकीय नेत्यांवर कारवाई केली. यात ९५ टक्के विरोधी पक्षातील नेते आहेत. म्हणजे ही विरोधी पक्षांवर पद्धतशीर आणि जाणूनबुजून केलेली कारवाई नव्हे काय? देशातील बहुपक्षीय लोकशाहीच्या अस्तित्वालाच सुरुंग लागतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य घोटाळा प्रकरणी ईडीने अटक केली. त्यामुळे देशात खळबळ उडाली. कारण ज्या पक्षाचा उगम अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून झाला आणि ज्या केजरीवालांचे नेतृत्व 'भ्रष्टाचारमुक्त भारत' या चळवळीतून उदयास आले, त्या केजरीवालांवर हजारो कोटी रुपयांच्या कथित मद्य घोटाळाप्रकरणी अटकेची कारवाई व्हावी ही विसंगतीच. कथित मद्य घोटाळा प्रकरणी ईडीने केजरीवाल यांना नऊ वेळा चौकशीसाठी समन्स पाठवूनही ते ईडीला सामोरे गेले नाहीत. त्यामुळे त्यांना अटक होणार हे अटळ होते. परंतु केजरीवाल यांना झालेल्या अटकेमागे राजकीय हिशेब मांडण्याचे आणि चुकते करण्याचे डावपेच दिसतात. दिल्ली आणि पंजाबमध्ये केजरीवाल यांच्या 'आप'ची सत्ता आहे. केजरीवाल आजवर भाजपच्या डावपेचांना राजकीय कौशल्याने तोंड देत अथवा तोडीस तोड उत्तर देत आले आहेत. 'आप'कडे केजरीवाल यांच्यासारखा दुसरा प्रभावी नेता नाही. त्यामुळे केजरीवाल हे तुरुंगात राहिले तर 'आप'च्या निवडणूक प्रचार मोहिमेला धक्का बसू शकतो. त्याचा फायदा भाजपला होऊ शकतो.

# ठीक ठिकाणच्या तोफांच्या सलामीत माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

सध्या लोकसभा निवडणुकीचे वातावरण असतानाच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी गुरूवारी माजलगाव येथील एका कार्यक्रमानिमित्त दौरा आयोजित केला होता या दौर्यानिमित्त जात असताना जवळपास २० गावांमधून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. आजूबाजूच्या वाड्या वस्त्यांमधील लोकही रस्त्यावर येऊन थांबलेले दिसले. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्साह बघण्यासारखा होता प्रचंड प्रमाणात घोषणाबाजी आणि क्षीरसागरांना आम्ही तुमच्याबरोबरच असल्याचा विश्वास प्रत्येक कार्यकर्ता देत होता. तुम्ही बांधाल ते तोरण आणि तुम्ही ठरवताल ते धोरण म्हणत कार्यकर्त्यांनी संवाद साधला.



दि.२८ रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे माजलगाव दौर्यावर जात असताना मोची पिंपळगाव, घोडका राजुरी, काठोडा, भवानवाडी, कुटेवाडी,वांगी, वायभटवाडी, शिवणी, जरूड, मैंदा, पोखरी, बाभुळखुंटा, मौंजवाडी, मौंज, ब्रम्हगांव, ढेकनमोहा, ढेकनमोहा तांडा, घाटसावळी, घाटसावळी तांडा, बक्करवाडी, कारळवाडी, निर्मळवाडी, मन्यारवाडी, मानकुरवाडी, आंबेसावळी, वलीपूर, घाटजवळा इत्यादी गावातील ग्रामस्थांनी ठीकठिकाणी स्वागत केले. काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघातील काही गावांचा डोंगरी विभागात सहभाग करून घेण्यासाठी माजी मंत्री क्षीरसागर यांनी प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नातून ज्या गावचा समावेश झाला त्या गावच्या गावकर्यांनी मोठ्या जल्लोषात काल त्यांचे स्वागत केले. माजलगाव येथील जेथलिया हॉस्पिटल चा शुभारंभ झाल्यानंतर येताना तेलगाव, वडवणी येथील प्रमुख कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. यावेळी माजलगावचे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस, संतोष जेथलिया, बबनराव सरवदे, सचिन दुग्गड, सर्कलमधील गंगाधर घुमरे व अरुण डाके, शेषराव फावडे, बाबुशेठ नहार, तेलगाव येथील डॉ.जयप्रकाश कलंत्री, डॉ बहादूर कलंत्री,ऍड जयप्रकाश कलंत्री,पत्रकार बाळाप्रसाद जाजू,विजयकुमार लगड,अशोक लगड, गुलाब राऊत, नवनाथ म्हेत्रे, ढेकनमोहा येथील बालाप्रसाद जाजू, माजी जि.प. सदस्य मंदे, विलास बडे, अच्युतराव शेळके, सरपंच आशोक वाघमारे, सरपंच बालासाहेब डाके, पंजाब शिंदे, सुनील डोळस, विष्णु मुंजाळ, सरपंच श्रीराम काकडे, बालासाहेब मुंडे, शाम काकडे, हाणुमंत बोरगे, सरपंच संजय सोलंकर ,राम भोगे, सरपंच गोरख दन्ने, सरपंच वाघमारे, उत्तम राठोड, लक्ष्मण पवार, गोवर्धन पवार, बाबुराव राठोड, हणुमंत देवकते, नारायण देवकते, सतिश देवकते, बाबु करांडे, कैलास देवकते, भगवान देवकते, रामदास कासकर, कमलाकर जाधव, श्रीराम जगताप, विष्णु पवार, बाजीराव पवार उपसरपंच, नवनाथ पवार, कैलास पवार, सखाराम गाडे, राधेश्याम फड, अशोक घुमरे, उत्रेश्वर घुमरे, बीड तालुका, माजलगाव तालुका, वडवणी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिंदेंच्या शिवसेनेची आठ उमेदवार यादी जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना तिकीट वाटपाची प्रक्रिया सुरू आहे. या मालिकेत महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. गुरुवारी जाहीर केलेल्या या यादीत ८ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यात कोल्हापुरचे विद्यमान खासदार संजय मंडलीक आणि हातकणंगलेचे विद्यमान खासदार धैर्यशील माने यांना तिकीट देण्यात आले आहे.**

## शिंदे गटाने जाहीर केलेले उमेदवार

मुंबई दक्षिण मध्य : राहुल शेवाळे. कोल्हापूर : संजय मंडलीक. शिर्डी : सदाशिव लोखंडे. बुलढाणा : प्रतापराव जाधव. हिंगोली : हेमंत पाटील. रामटेक : राजू पारवे. हातकणंगले : धैर्यशील माने. मावळ : श्रीरंग आप्पा बारणे.

महाराष्ट्रात जागावाटपाबाबत महायुतीमध्ये जवळपास एकमत झाले आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ जागांपैकी भाजप २८ जागांवर एनडीएच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीत निवडणूक लढवणार आहे. याशिवाय शिवसेना (शिंदे गट) १४ जागांवर निवडणूक लढवणार आहे. तसेच राष्ट्रवादीसाठी (अजित पवार गट) ५ जागा सोडल्या जातील. राष्ट्रीय समाज पक्षालाही एक जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, अभिनेते गोविंदा अहुजा लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची चर्चा जोरात सुरू आहे. गुरुवारी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर आता ते आगामी लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे.

# जरांगे पाटील चुकतील अशी परिस्थिती निर्माण केली जातेय-कवठेकर

**बीड । प्रतिनिधी**

मला राजकारणातले काही कळत नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला या लोकसभा निवडणुकीत सहभाग घेण्यासाठी प्रत्येक मतदारसंघात मराठा समाजाचा एकच अपक्ष उमेदवार असायला हवा, अशी सूचना केली आहे. जी योग्य व उपयुक्त अशीच सूचना मराठा आरक्षणाच्या दृष्टीने आहे. पण याचा निर्णय ते ३० मार्च रोजी सर्व जिल्ह्यांतील मराठा समाजाने दिलेल्या अहवालाच्या आधारे घेऊन जाहीर करणार आहेत. पण दरम्यानच्या काळात जरांगे पाटील हे कुठल्यातरी राजकीय पक्षाशी निवडणुकीसाठी आघाडी किंवा युती करू शकतात, अशा वावड्या उठल्या आहेत. ज्यामुळे मराठा समाजाच्या मनात मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. कारण अपक्ष उमेदवार म्हणजे मराठ्यांचा कुठल्याही राजकीय पक्षाशी किंवा नेत्यांशी काडीमात्र संबंध नाही असाच त्याचा सरळ सोपा अर्थ आहे. तर फक्त आरक्षणाच्या विषयावर एकजूट झालेला सकळ मराठा समाज निवडणुकीमध्ये मात्र मनोज जरांगे पाटलांचा शब्द किती प्रमाण मानतो? हे कळून घेण्याचा एक चांगला व सोपा मार्ग सुद्धा आहे. त्यामुळे जरांगे पाटलांनी ३० तारखेला निर्णय घेताना मराठा समाजाच्या अपक्ष उमेदवाराचा संबंध कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध दाखविणारा असणार नाही, याची काळजी घ्यावी. कारण मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाचे राजकीयिकरण करून त्यांना चुकीचा निर्णय घ्यायला लावणारी परिस्थिती मुद्दामहून निर्माण केली जात आहे, हे स्पष्टपणे दिसत आहे.पण याला जरांगे पाटलांनी राजकीय नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्यानंतरही आपली स्पष्ट भूमिका लोकांना न सांगणे सुध्दा कारणीभूत आहे, असे आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अध्यक्ष शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

पत्रकात म्हटले आहे की, मनोज जरांगे पाटील म्हणतात की आपला कुठल्याच पक्षाला विरोध नाही पण सोबतच कुठलाच पक्ष आपला नाही असेही ते म्हणत असतात. याचा दुसरा अर्थ असा होतो की, त्यांना एखाद्या पक्षाला विजयी करण्यात किंवा दुसऱ्या एखाद्या पक्षाला पराभूत करण्यात काही रस असल्याचे दिसत नाही. त्यांना रस आहे तो केवळ ओबीसीतून मराठा आरक्षण मिळवण्यात. पण त्यांच्या या मागणीला आजपर्यंत किंवा कधीही आणि कुठल्याही पक्षाने समर्थन दिलेले नाही. आणि मराठ्यांना ओबीसीतुन आरक्षण सुद्धा आजपर्यंत त्यामुळेच मिळालेले नाही. हे पाहता, जरांगे पाटलांची या लोकसभा निवडणुकीकडे पाहण्याची दृष्टी अगदी निकोप, द्वेषरहित व मराठा समाजाची एकजूट अधिक बळकट करणारी असायला हवी. तरच ती सकळ मराठा समाजाला आकृष्ट करू शकते, हे जरांगे पाटलांनी गांभीर्याने लक्षात घेण्याची गरज आहे. नसता, त्यांनी कुठल्याही राजकीय पक्षाबरोबर युती किंवा आघाडी केली किंवा एखाद्या पक्षाबद्दल किंवा नेत्याबद्दल ममत्व भाव दाखवला तर एकजूट झाल्यासारखा दिसत असलेला मराठा समाजाचा विचार अगदी सहज विस्कटून जावू शकतो, हे त्यांनी ध्यानी घ्यावे. म्हणजेच महाराष्ट्रात मराठा समाजाची एकूण लोकसंख्या जर ५ कोटी इतकी गृहीत धरली. तर त्यापैकी



तीन ते साडेतीन कोटी लोकसंख्या ही मतदार असू शकते. त्यापैकी सत्तर टक्के लोकांनी जर मतदान केले, तर ती संख्या दोन ते सव्वा दोन कोटी इतकी होऊ शकते.या दोन सव्वादोन कोटी लोकांपैकी किती मतदार सकळ मराठा समाजाच्या अपक्ष उमेदवाराला मतदान करतात ते कळल्यानंतर, राज्यातील किती मराठा समाज जरांगे पाटलांच्या नेतृत्वाखाली एकवटला आहे हे समजून येणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ऍड प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला एकही उमेदवार निवडून न येता ४०-४१ लाख मतदान मिळाले होते.तेंव्हापासून बाळासाहेबांचे प्रस्थ व प्रतिष्ठा राज्याच्या राजकारणात वाढलेली आहे. आणि म्हणून प्रत्येक मतदारासंघात मराठा समाजाचा एकच अपक्ष उमेदवार उभा करून जर जरांगे पाटील एक कोटी जरी मतदान मिळवू शकले,तर मराठा समाजाच्या एकजुटीला खूप बळ मिळू शकते,ज्याचा उपयोग ओबीसीतून आरक्षण मिळवण्याकरिता व आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये दबावगट म्हणून त्याचा निर्णायक उपयोग होवू शकतो. पण हे करत असताना मराठा समाजाबरोबर इतरही जाती आहेत आणि त्यामुळे सर्व जाती धर्माचे उमेदवार मराठा समाजाने उभे करायला हवेत, या अतिशय भोळ्या भाबड्या विचारातून मात्र जरांगे पाटलांनी स्वतःही बाहेर निघायला हवे. कारण कुठलाही समाज जातीयवादी नसतो पण या देशातील सत्तर टक्के मतदार मात्र जात पाहूनच मतदान करतो, हे प्रखर वास्तव नाकारण्यात काही अर्थ नाही.आणि त्यामुळे मराठा समाजाचा अपक्ष उमेदवार हा मराठाच असायला हवा. नाहीतर इतर जातीच्या उमेदवाराला मराठा समाज काही मतदान करणार नाही. आणि त्यामुळे इतर जातीच्या व्यक्तीस जरांगे पाटलांनी उमेदवारी देऊ नये. नसता त्यांच्यात आणि इतर जातीच्या मतदारांचे आपल्या राजकीय स्वार्थासाठी लांगुल चालन करणाऱ्या राजकीय नेत्यांमध्ये काय फरक आहे तो लोकांना कळणार नाही. पण हे सगळे करत असताना आपल्याला निवडणुकीत विजय मिळवणे हे आपले उद्दिष्ट नसून समाज आपल्या जिव्हाळ्याच्या आरक्षणाच्या विषयाकरिता किती एकजूट होऊ शकतो हे तपासण्याचा आहे, हा ठामपणा जरांगे पाटलांच्या मनात असायला हवा.कारण अशा ठाम व प्रामाणिक विचाराने प्रभावित होऊनच सकळ मराठा समाज संघटितपणे आपल्या अपक्ष उमेदवारास एकगठ्ठा मतदान करू शकतो. ज्याचे भयंकर परिणाम राज्याच्या राजकारणावर आगामी काळात होणार आहेत. ते म्हणजे, मराठा समाजाबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्या मनात द्वेषभावना आहे असे जरांगे पाटील नेहमीच म्हणत आले आहेत. त्या फडणवीसांच्या भाजपला व त्यांच्या मित्रपक्षांना याचा सर्वात जास्त फायदा होऊ शकतो. पण जरांगे पाटलांच्या पाठीमागे शरद पवार आहेत का? हा लोकांच्या मनातील संशय मात्र पूर्णपणे संपुष्टात येऊ शकतो, जे खूप महत्त्वाचे सुद्धा आहे.त्यामुळे जरांगे पाटलांनी ३० तारखेला निर्णय घेताना संपूर्ण विचार करूनच निर्णय घ्यावा, व समाजाच्या मनातील त्यांच्याबद्दलचा आदर वृद्धिंगत होईल असाच तो निर्णय असायला हवा! असे प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

# पान १ वरून...

## सांगली जिल्ह्यातील पाच हजार

जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, यासाठी नागरिक जागृती मंच, शेतकरी कामगार पक्ष, नागरिक जागृती मंच, स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलनाची हाक दिली आहे. दरम्यान, शासनाने ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मोबदल्याबाबतच्या परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. गुणांक एक नुसार मोबदला देणार आहोत; तोही रेडीरेकनरनुसार. त्यामुळे एक एकर जमिनीचा दिला जाणारा मोबदला अतिशय तोकडा असेल. त्या भरपाई मोबदल्यात एक गुंठा जमीनही मिळणार नाही. या अन्यायाविरोधात आमचा लढा असेल. भूसंपादन अधिनियम १९५५ नुसार सार्वजनिक हितार्थ म्हणून सक्तीने केले जाणार असल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

---------

## बीड जिल्ह्यात सामाजिक सलोख

झाले. त्यानंतर त्या दुसऱ्या दिवशी श्री क्षेत्र नारायण गड येथे दर्शनासाठी जात असताना साक्षाळपिंपरी येथे मराठा समाजातील काही तरुणांनी त्यांना काळे झेंडे दाखवले. या तरुणांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर पंकजा मुंडे यांनी या घटनेची दखल घेऊन मराठा समाजातील तरुणांवर गुन्हे दाखल करू नये अशी विनंती पोलिसांना केली. या घटनेनंतर तरी मुंडे यांना विरोध होईल, असे वाटत नव्हते. मात्र केज तालुक्यातील औरंगपूर आणि श्री क्षेत्र पावनधाम येथे पंकजा मुंडे या भेट देणार होत्या. या ठिकाणी काही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलिसांनी खबरदारी सुद्धा घेतली होती. मात्र पंकजा मुंडे या पावनधाम परिसरात येतात त्यांना तीव्र विरोध करण्यात आला. मराठा समाजातील तरुणांनी घोषणाबाजी करत आपण अखंड हरिनाम सप्ताह येथे येऊ नये असे सांगितले. त्यानंतर यावेळी मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला. शेवटी परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. या घटनेच्या अगोदर पंकजा मुंडे यांनी स्वतः आपण मराठा समाजाच्या आरक्षण मागणीच्या विरोधात नाहीत, समाजाची मागणी जास्त आहे, मनोज जरांगे यांच्या मागणीला आपला पाठिंबा आहे, असे जाहीरपणे सांगितले होते. तरीही केज तालुक्यामध्ये त्यांची गाडी आडवून त्यांना विरोध दर्शवण्यात आला. शिवाय पंकजा मुंडे यांनी मराठा आणि ओबीसी वाद शिगेला पोहोचला असताना सुद्धा मराठा समाजाच्या मागणीला विरोध केला नव्हता. आणि ओबीसी व्यासपीठावर जाणे सुद्धा टाळले होते. तरीही त्यांना प्रचारादरम्यान स्वतःच्याच जन्मभुमीत मराठा समाजाकडून तिव्र विरोध होत आहे. केज मधील घटनेनंतर ज्यांनी विरोध दर्शवला ते मनोज जरांगे यांचे आंदोलनकर्ते नाहीत, ते दुसरेच कोणीतरी आहेत अशी शंका सुद्धा पंकजा मुंडे यांनी उपस्थित केली होती. त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघात जाणीवपूर्वक सामाजिक वातावरण घडुळ करण्यासाठी तिसरी अदृश्य शक्ती तर सक्रिय झाली नाही ना? असा संशय सध्या व्यक्त केला जात आहे. स्व. गोपीनाथ मुंडे यांनी सुद्धा मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देत कोणत्याही परिस्थितीमध्ये आरक्षण मिळालेच पाहिजे अशी भूमिका घेतली होती. मुंडे यांच्या अकाली निधनानंतर वेळोवेळी पंकजा मुंडे यांनी सुद्धा मराठा आरक्षणाच्या बाजूनेच भूमिका जाहीर केलेली आहे. तरीसुद्धा त्यांना बीड जिल्ह्यामध्ये मराठा समाजाचा रोष पत्करावा लागत आहे हा रोष नेमका समाजाचा आहे की अदृश्य शक्तीने घडवून आणलेल्या कटाचा आहे, याबद्दल सुद्धा सध्या चर्चा रंगू लागले आहेत. एकीकडे एक उमेदवार ओबीसी आहे, तर दुसरे तीन संभाव्य उमेदवार मराठा समाजातून येतात. त्यांना मात्र विरोध होत नाही तर पंकजा मुंडे यांना कडवा विरोध होत होत आहे. मराठा समाजाच्या मागणीला कोणीही विरोध करु शकत नाही, मागणीही रास्त आहे. पण विरोध होताना मग तो कोणत्या जातीचा आहे, हे पाहणे चुकीचे आहे, असे मत जिल्ह्यातील सुज्ञ नागरीकांचे आहे. त्यामुळे गावात येऊ द्यायचे नाही तर कोणत्याच उमेदवाराला येऊ देऊ नका, असेही म्हटले जात आहे, कारण जातीवाद करुन कोणत्याच समाजाचे चांगले झाले नाही, असा सुर सुध्दा समाजातील नागरीकांचा आहे. बीड जिल्हयात जाणिवपुर्वक जातीयवाद करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिसऱ्या अदृश्य शक्तीचा डाव यशस्वी होऊ द्यायचा नसेल तर मराठा व ओबीसी समाजातील नागरीकांनी वेळीच जागृत होण्याची गरज असल्याचेही म्हटले जात आहे.

----------

## मनरेगाच्या मजुरीत

मजुरीत झाली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना मनरेगाच्या निधीमध्ये वाढ करण्याची घोषणा केली होती. तसेच मनरेगासाठी निधीची तरतूद २०२३-२४ या आर्थिक वर्षात अंदाजे ६० हजार कोटी रुपये इतकी होती. जी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ८६ हजार कोटी रुपये करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा निधीत २६ हजार कोटींची वाढ करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारने शेकऱ्यांसह सर्वसामान्यांना खुश करण्यासाठी अनेक घोषणा केल्या होत्या. यापाठोपाठ आता मजुरांना खुश करण्यासाठी मोदी सरकारने घोषणा केली आहे. सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) अंतर्गत येणाऱ्या मजुरांच्या मजुरीत वाढ केली आहे. यामुळे या योजनेतंर्गत काम करणाऱ्या मजुरांना जास्त वेतन मिळणार आहे.

**कोणत्या राज्यात किती मजुरी?**

मनरेगाच्या मजुरीत वाढ करण्याची घोषणा सरकारने केली आहे. यानंतर सर्वाधिक वाढ ही गोव्यात झाली असून येथे मजुरीत ३४ रूपये वाढ करण्यात आली आहे. गोव्यात या आधी ३२२ रुपये प्रतिदिन मजुरी मिळत होती. ती आता वाढून ३५६ रुपये झाली आहे. तर तर सर्वात कमी मजुरी उत्तराखंडमध्ये दिली जाणार असून येथे ३.०४ टक्के वाढ झाली आहे. येथे फक्त ७ रूपये वाढ झाली आहे. येथे आधी २३० रुपये मजुरी दिली जात असे ती आता २३७ रुपये प्रतिदिन असेल. म्हणजेच गोवा आणि उत्तराखंडमधील मजुरीत ११९ रूपयांचा फरक आहे.

**महाराष्ट्रात २४ रूपये वाढ**

याआधीही मनरेगा मजुरांच्या मजुरीत २६ रूपयांनी वाढविण्यात आली होती. यानंतर आता २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्रात २४ रूपयांची वाढ करण्यात आली असून आता कामगारांना प्रति दिवशी २९७ रूपये मजुरी मिळणार आहे. तर याच्याआधी २७३ रूपये मजुरी मिळत होती.

--------

## सकल मराठा समाज भुजबळांविरोधात

गुरुवारी (दि.२८) झालेल्या सकल मराठा समाजाची बैठक नाशिकच्या नांदूरनाका परिसरातील शेवंता लॉन्समध्ये पार पडली. नाशिक जिल्ह्यातील सकल मराठा समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत छगन भुजबळांविरोधात नाराजीचा सूर उमटला. निवडणुकीत छगन भुजबळांच्या विरोधात मराठा उमेदवार द्या, मराठ्यांच्या मुलांचा तोंडचा घास पळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भुजबळांना गाडण्यासाठी उमेदवार द्यायचा, असे मनोगत या बैठकीत सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

**बैठकीचा अहवाल मनोज जरांगेंना पाठविणार**

नाशिकच्या लोकसभा निवडणुकीसाठी सकल मराठा समाजाकडून उमेदवाराची चाचपणी केली जात आहे. या बैठकीचा अहवाल मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना पाठवण्यात येणार आहे. नाशिकमधून मराठा समाज कोणता उमेदवार देणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. तर दुसरीकडे नाशिकचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या भेटीला मुंबईकडे रवाना झाले आहेत. त्यामुळे आता महायुतीतून उमेदवारी भुजबळांनाच मिळणार की हेमंत गोडसेंना? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

------------

## काँग्रेस उमेदवार रश्मी

त्यामुळेच रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र समितीने रद्द केले असल्याची टीकाही यावेळी केली. पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, लोकशाही मार्गाने, जनतेच्या दरबारात जाऊन निवडणूक लढणाऱ्या रश्मी बर्वे यांच्यावर अन्याय झाला आहे. इतके झाले तरी काँग्रेस लढत राहणार, न्यायालयात आम्ही दाद मागणार असल्याची माहितीही विजय वडेट्टीवार यांनी दिली.

**समिती वर कारवाई झाली पाहिजे - वडेट्टीवार**

कायद्यानुसार १७ फेब्रुवारी २०२० ला रश्मी बर्वे यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले होते, त्यामुळे जात पडताळणी समितीला हे प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार नाही. समितीने अधिकार कक्षेच्या बाहेर जाऊन हा निकाल दिला आहे, त्यामुळे या समिती वर कारवाई झाली पाहिजे ही आमची मागणी असल्याचेही यावेळी सांगितले. विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, जी समिती जात प्रमाणपत्र देते ती समिती जात वैधता प्रमाणपत्र रद्द करू शकत नाही. जात प्रमाणपत्राबाबत समितीने २० मार्च रोजी नोटीस दिली आणि आठ दिवसात हे प्रमाणपत्र रद्द केले. नवनीत राणा यांचे जात वैधता प्रमाणपत्र हायकोर्टाने रद्द केले होते, सुप्रीम कोर्टात प्रकरण प्रलंबित राहून पाच वर्ष खासदारकी पदावर राहिल्या, आणि आता भाजपाने उमेदवारी दिली अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

----------

## बीडच्या गटविकास अधिकाऱ्यांचे

सूचना देण्यात आल्या होत्या. ग्रामपंचायतकडून ठराव न घेताच बीड तालुक्यातील जवळपास ३२ गावात ही कामे पूर्ण करण्यात आली. ज्या कामाला जास्तीत जास्त एक लाख रुपये खर्च येतो त्यासाठी शासन ४ लाख रुपये खर्च करायला तयार झाले आणि या गावातील कामे भराभर पूर्ण करण्यात आली. मात्र ही कामे पूर्ण करताना ग्रामपंचायतचा मागणी ठराव, काम पूर्ण झाल्याचा ठराव आणि पत्र, ही कामे हस्तांतरित केल्याचा ठराव आणि पत्र या संस्थेकडून घेण्यात आले नाही. आता गटविकास अधिकाऱ्यांना एवढी घाई का झाली आहे. सह्याद्री कन्स्ट्रक्शनचा आणि गटविकास अधिकाऱ्यांचा काय संबंध अशा अनेक प्रश्नांची चर्चा आता सरपंच करू लागले आहेत. या संदर्भात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेलाही सोबत घेऊन काम पूर्ण करावे, असेही स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, कुठल्याही नियमाचे पालन न करता ही कामे करण्यात आली. सदर गावातील एकूण खर्चापैकी दहा टक्के रक्कम लोकवर्गणी जमा करणे अनिवार्य असल्याचे म्हटले आहे. ही लोकवर्गणी जलजीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार रोख रकमेमध्ये किंवा श्रमदानातून द्यावी आणि यासाठी ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करावा अशा सूचना करण्यात आल्या होत्या मात्र या कंपनीने कुठल्याही नियमाचे पालन न करता थेट काम करून याचे ठरावही न घेता काम पुर्ण करण्याची घाई केली आणि आता एक वर्षानंतर कंपनी आणि गटविकास अधिकाऱ्यांना जाग आली असून, आता एकाच वेळी सर्व ठराव आणि पत्र घेण्यासाठी घाट घातला जात आहे. ग्रामसेवकांना सोमवार पर्यंत ही सर्व पत्र जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जे काम लाखभर रुपयात होणार आहे त्यासाठी चार लाख रुपये खर्च करण्याचा नेमका हेतू काय हेही स्पष्ट होत नाही. याबाबतही सरपंच गावागावात चर्चा करत आहेत. यात नेमके कोणाचे हात ओले होणार अशी चर्चा चालू आहे.

-----------

## जल जीवन मिशन मधील

मिशन राबवण्यासाठी ४ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार सन २०२४ पर्यंत राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास घरगुती नळ जोडणी द्वारे प्रति माणशी ५५ लिटर पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. या उपक्रमासाठी शासनाच्या धोरणानुसार अंमलबजावणी सहाय्य संस्थांची जिल्हास्तरावर नेमणूक करण्यात आली होती. त्यांचा कार्यकाल ३१ मार्च २०२४ रोजी संपत असून यानंतर पुढील काळात नेमणूक आदेश राज्य शासनाच्या पाणी व स्वच्छता मिशन यांना अवगत केल्याशिवाय या संस्थांना पुनर्नियुक्ती किंवा करारनामा करू नये, अशा स्पष्ट सूचना जलजीवन मिशनच्या अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात देण्यात आल्या आहेत. या संस्थांच्या विरोधात अनेक तक्रारी असून या तक्रारी राज्य स्तरावर पोहोचल्या आहेत. या तक्रारीची दखल घेऊन या संस्थांना पुन्हा नियुक्त देण्यापूर्वी याची छाननी करून आणि राज्य शासनाच्या समन्वयाने नियुक्त्या कराव्यात असे स्पष्ट करण्यात आले आहे.

---------

## शरद पवारांचा मास्टर स्ट्रोक;

यांनी महायुतीच्या विरोधामध्ये बंडाचे निशाण रोवले आहे. महाविकास आघाडीकडून ज्योतीताई मेटे आणि बजरंग सोनवणे या दोघांपैकी एकास उमेदवारी मिळेल असे म्हटले जात असतानाच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उमेदवारीच्या स्पर्धेमध्ये अनपेक्षित पणे उडी घेतली आहे. गेल्या काही वर्षापासून जयदत्त क्षीरसागर हे थोडे सक्रिय राजकारणापासून बाजूला होते. बीड जिल्ह्यातील राजकारणामध्ये त्यांचे महत्त्व काय आहे हे सांगण्याची गरज नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये जी काही नावे चर्चेत होती त्यामध्ये जयदत्त क्षीरसागर हे नव्हते. गुरुवारी त्यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये समर्थक आणि कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. सर्वच ठिकाणी त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरू असताना आणि भाजपचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर जो नेता उमेदवारीच्या स्पर्धेतही नाही त्यांनी अचानक मतदारसंघांमध्ये भेटीगाठी सुरू केल्यानंतर निश्चितच अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शरद पवार हे बीड जिल्ह्यामध्ये सक्षम उमेदवार देण्याच्या शोधात असताना अचानकपणे जयदत्त क्षीरसागर यांनी समर्थकांच्या गाठीभेटी सुरू केल्याने शरद पवार यांचा हाच तर तगडा उमेदवार नाही ना? अशी चर्चा आता रंगू लागली आहे.


**तर ओबीसी विरुद्ध ओबीसी अशी होईल सर्व टक्कर**

शरद पवार यांनी जयदत्त क्षीरसागर यांना बीड लोकसभेची उमेदवारी महाविकास आघाडीच्या माध्यमातून दिली तर ओबीसी विरुद्ध ओबीसी अशी बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये होऊ शकते, असे म्हटले जात आहे. कारण जयदत्त क्षीरसागर यांचे समर्थक संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये आहेत. उमेदवार म्हणून ते जर पुढे आले तर पंकजा मुंडे यांची डोकेदुखी वाढणार हे तेवढेच निश्चित आहे.

------------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. २९ मार्च २०२४ ३

## दिंद्रुड येथे संत तुकाराम बीज व गाथा पारायण सांगता



दिंद्रुड : माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीज सोहळा व मासीक गाथा पारायण सांगता मोठ्या उत्साहात काल (२७ मार्च) बुधवारी साजरा करण्यात आला.

येथील मंदिरात महिनाभर सुरू असलेल्या मासीक गाथा पारायण सोहळ्याचा दिपोत्सव कार्यक्रम मंगळवारी (२६ मार्च) रात्री नऊ वाजता उत्साहात पार पडला. काल बुधवारी सकाळी नऊ ते साडेदहा पर्यंत गावातून दिंडी प्रदक्षिणा घालण्यात आली. यावेळी बालगोपाळांसह महिला-पुरुष तुकाराम... तुकाराम... च्या गजरात न्हाऊन गेले. संत तुकाराम महाराजांच्या भजन-पूजनाचा कार्यक्रम अतिशय भक्तिमय वातावरणात पार पडला. त्यानंतर ह.भ.प. माऊली महाराज उंबरेकर यांचे हरिकिर्तन प्रसन्न वातावरणात संपन्न झाले. मोठ्या थाटामाटात उत्साहपूर्ण वातावरणात विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री.संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीजोत्सव सोहळा व मासीक गाथा पारायण सांगता संपन्न झाले. या सोहळ्याला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उन्हाचा पारा ४० अंशावर ; उकाडा वाढल्याने नागरिक हैराण

## घरामध्ये आडगळीत पडलेले पंखे,कुलर निघाले बाहेर

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

तालुक्यात व शहरात सकाळी ११:०० वाजल्यापासून उन चटकत असल्याने उष्णतेचा पारा ४० अंशाने वाढला आहे.नागरिकांची घामाने अंगाची लाहि लाही होत असल्याने घरात आडगळीत पडलेले पंखे व कुलर बाहेर निघाल्याने दुरुस्ती करणाऱ्या कारागिरांना अच्छे दिन आले असून कारागिर पंखे व कुलर दुरुस्तीच्या कामात सध्या व्यस्त आहेत.

यावर्षी तालुक्यात चांगला पाऊस न झाल्याने मागच्या वार्षीच्या तुलनेत उष्णतेचे प्रमाण अधिक आहे.मार्च महिना संपत आला असुन मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उष्णतेचा पारा ४० अंशा कडे झुकला जात आहे. त्यामुळे नागरिक महत्त्वाच्या कामा व्यतिरिक्त आप-आपल्या



परीच थांबत असल्याने उष्णतेमुळे नागरिक, लहन मुले व वृद्ध घरी बसणेच पसंत करत कोणत्याही कामाशिवाय नागरिक पराबाहेर पडत असल्याने बाजार पेठेत शुकशुकाट आहे. सकाळपासूनच सूर्य आग जोखत आहे. त्यामुळे उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याने नागरिक लहान मुले व वृद्धाची गरमीने घामाघुम होऊन अंगाची लाही लाहि होत आहे.त्यामुळे घरात आडगळीत पडलेले कुलर व पंखे बाहेर पडले असुन ते दुरुस्ती करण्यासाठी शहरातील व ग्रामीण भागातील कारागिरांना अच्छे दिन आले असल्याचे वित्र दिसत आहेत.ऐन उन्हाळ्यात कुलर व पंखे दुरुस्तीच्या निमित्ताने प्रामीण भागातील कारागिराना रोजगाराची संधी उपलब्ध होत असून नविन कुलर व पंखे विक्रीसाठी बाजारात मोठ्या प्रमाणात आले आहे.सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने नागरिकांना आर्थिक चन चन भासत असल्याने ग्राहाकांनी कुलर व पंखे खरेदी पेक्षा दुरुस्तीवर जास्त भर असल्याचे बाजार पेठेतील कुलर व पंखे विक्रेते यांनी सांगितले.

### विक्रीपेक्षा दुरुस्तीवर भर

तालुक्यात सध्या दुष्काळी परिस्थिती असल्याने ग्राहकांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे, तसेच कुलरची भाववाढ झाली आसल्याने ग्राहक नवीन कुलर, पंखे न घेता जुनेच कुलर, पंखे तसेच अन्य उपकरणे दुरुस्त करुन वेळ भागवत आहेत.

-विभीषण लांबुड, दुरुस्ती कारागीर, माजलगाव

### अशी सावधानता बाळगा!

घरातील आडगळीत पडलेले कुलर व पंखे हे अनुभवी कारागीरांना दाखवून चालु करावे,तसेच चालु कुलरला ग्राहकांनी किंवा त्यांच्या घरातील लाहन मुलांना कुलरला हात लाऊ नये,चालु कुलर मध्ये पाणी टाकु नये,बटण बंद करुन कुलरमध्ये पाणी टाकाये, लहान मुलांना कुलर जवळ जाऊ देऊ नये, शक्यतो फुलर बाहेरच्या बाजुने खिडकीत ठेवावे.

## गेवराई येथील स्ट्राँग रूमची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

गेवराई येथील स्ट्राँग रूमची जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी बुधवारी दौऱ्या दरम्यान पाहणी केली तसेच आढावा बैठक घेतली.

गेवराई तालुक्यातील गढी येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे निवडणुकीच्या अनुषंगाने स्ट्राँग रूम तयार केली असून याची पाहणी जिल्हाधिकारी यांनी केली. यावेळी तालुक्यातील प्रत्येक विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी पाणीटंचाई विषयी आढावा बैठक घेतली तसेच येथील गोविंदवाडी साठवण तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली.



बीड : वाहतुक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक सुभाष सानप यांनी दै. लोकतंत्रच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी आमचे सहकारी अनिल जाधव व मी त्यांचा सत्कार केला.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २८ मार्च रोजी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने १७ जानेवारी ते १७ फेब्रुवारी या कालावधीत 'बायोफर्टीलायझर्स अँड ऑरगॅनिक फर्टीलायझर' या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात आला. अभ्यासक्रमास २४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या अभ्यासक्रमाचा समारोप कार्यक्रम शुक्रवारी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रोफेसर किशोर मचाले, उपप्राचार्य प्रोफेसर गणेश पाचकोरे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर ज्योती क्षीरसागर यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाविषयी थोडक्यात माहिती देत जैविक खतांचे शेतीमधील महत्व स्पष्ट केले. याप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रोफेसर गणेश पाचकोरे यांनी केले.

## न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथील प्रि स्कुलच्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हीजन पब्लिक स्कूल प्रस्तूत टॉडलर्स व्हिले प्रि स्कुल ,यु के जी च्या विद्यार्थ्यांचा २०२३-२४चा पदवी प्रदान सोहळा नुकताच विविध मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला. दिनांक २७ मार्च रोजी न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या आवारात पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. या पदवीदान समारंभ प्रसंगी बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, धनराज सोळंकी, प्राचार्य रेंजो आर चंद्रन, प्रा बिराजदार हे उपस्थित होते.

या पदवीदान समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलन व माता



सरस्वती देवीचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा रेंजो आर चंद्रन यांनी केले. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक वर्ग आणि व्यवस्थापन समिती सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी प्रा रेंजो आर चंद्रन यांनी सांगितले.विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी लागावी, मुले सुसंस्कारित व्हावीत , त्यांना आसपासच्या वातावरणातील त्याचबरोबर समाजातील विविध रंग , आकार, चव, स्पर्श तसेच अन्य गोष्टींची ओळख व समज व्हावी यासाठी येथील शिक्षाकांकडून विशेष प्रयत्न केले जातात अशी माहिती संस्थेचे संचालक संकेत मोदी यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम वेळोवेळी घेऊन विद्यार्थ्यांना सजग बनवून त्यांना त्याचा पुढच्या आयुष्यासठी या संस्थेत घडविले जाते याचा आपनास आनंद होत असल्याने संचालक संकेत मोदी यांनी नमूद केले. शाळेतीळ जवळपास ८०च्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी देण्यात आली. व्यासपीठावरून संस्थेचे कार्यकारी संचालक श्री संकेत राजकिशोर मोदी डॉ. डी.एच. थोरात, डॉ. नवनाथ घुगे , ॲड.संतोष पवार , श्रीमती सविता बनाळे , प्रा. सुरेश बिराजदार , उपस्थित होते. पदवी स्वीकारल्यानंतर चिमुकल्यांनी आपल्या बोलीभाषेत स्वतःचे मनोगत व्यक्त केले. त्यातूनच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती झाली . पालकांनी शाळेतील विविध उपक्रमांचे कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी , प्रा. खडकभावी, यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## असदोद्दीन काझीचा पहिला रोजा पूर्ण

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

येथील काझी गल्ली येथील रहिवासी असलेले रौफोद्दीन हाफिजोद्दीन काझी यांचे चिरंजीव असदोद्दीन काझी (वय ७) याने आयुष्यातील पहिला रोज़ा पुर्ण केला. घरातील मोठी मंडळी दररोज़ पहाटे उठून सहरी करत रोज़े धरतात. त्यांच्यासोबत लहान मुलेही उठतात आणि सहरी करून रोज़े धरतात. अशाच प्रकारे अवघ्या सात वर्षीय असदोद्दीन याने ही आयुष्यातील पहिला रोज़ा ठेवून पूर्ण केला. एकीकडे सूर्य आग ओकत असताना व तापमान ४० अंशापेक्षा जास्त असताना जिथे भल्याभल्यांच्या जिवाची लाही लाही होत आहे तिथे इस्लाम धर्माचा सर्वात पवित्र महिना म्हणून गणला जाणारा रमज़ान अशा उष्ण वातावरणात सुरू आहे. अशा वातावरणामध्ये दोन चार तास



जरी माणूस पाण्याविना राहिला तर त्याला अशक्तपणा आल्यासारखे वाटते. मात्र अशा वातावरणात सुद्धा पाच ते अकरा वर्षातील लहान मुले रोजा ठेवण्याचे धाडस दाखवीत असल्याचे सगळीकडे दिसून येत आहे. यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत रोज़ा ठेवल्यानंतर रोज़ेदारांना अल्लाहकडून अदृश्य शक्ती मिळते यावर शिक्कामोर्तब होतो. यामुळेच लहान मुलेही रोजा ठेवण्यास समर्थ ठरताना दिसतात. अशाच प्रकारे असदोद्दीन ने ही रोजा ठेवल्याने त्याचे आजोबा हाफिजोद्दीन काझी, वडील रौफोद्दीन काझी, चुलते अजहरोद्दीन काझी, समिरोद्दीन काझी, हाजी बुक डेपो तथा रॉयल एजन्सी चे संचालक हकीम अब्दूल कय्युम (नाना), मुहीबोद्दीन काझी, वजहातोद्दीन काझी व नातेवाईकांनी असदोद्दीनचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## मांजरातील पाण्याला मृतसाठ्याची ओढ; फक्त ७ टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड-लातुर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात आज २८ मार्च अखेर पर्यंत फक्त ७ टक्केच जिवंत पाणी साठा शिल्लक असून येत्या काही दिवसांत हा जिवंत पाणीसाठा संपून मृत भांड्यातील पाण्यावर या शेकडो गावातील लोकांना अवलंबून रहावे लागणार आहे.

बीड जिल्ह्यासह संपुर्ण मराठवाड्यात यावर्षी अल्प पावूस झाला असल्यामुळे मराठवाडा विभागातील अनेक मोठी धरणे यावर्षी भरली नव्हती. त्यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार हे गृहीत ठरलेलेच होते.




यावर्षी बीड लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात पावसाळा संपण्यापूर्वी जेमतेम पाणी साठा जमा झाला होता. धरणातील पाण्याचा सततचा मोठ्या प्रमाणावर होणा-या उपसा मुळे बघता बघता धरण मृत साठ्याच्या पाणी पातळीपर्यंत येवून पोहंचला आहे.

आज २८ मार्च अखेर धरणात फक्त ७. ९४ टक्के एवढाच पाणीसाठा शिल्लक असल्याची अधिकृत माहिती आहे. मांजरा धरणाच्या पाणीपातळी कडे दररोज लक्ष ठेवून असलेल्या लातुर पाटबंधारे उपविभाग क्रमांक १ कार्यालयातील शाखा अभियंता सुरज निकम यांनी दिलेल्या अधिकृत माहिती नुसार २२४.०९३ पाणी साठवण क्षमता असलेल्या मांजरा धरणात फक्त ६१.१७४ एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरणात फक्त १४.०४४ एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरण क्षेत्रात सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर जाणवत असल्यामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण ही वाढले आहे. सध्या हे प्रमाण ७.२ एवढे आहे.

मांजरा धरणातील आजचा पाणीसाठा लक्षात घेता येत्या काही दिवसांत एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मांजरा धरणातील पाण्याची पातळी ही शुन्य साठ्या पर्यंत जाईल. म्हणजे एप्रिल महिना, मे आणि जून महिना पूर्ण अशी तीन महिने या तीन जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे.

### प्रशासन निवडणुकीच्या तयारीत मग्न !

मांजरा धरणातील पाणी शुन्य पातळी कडे पोहोचत असलेतरी पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत जाणवणा-या संभाव्य पाणी टंचाई चार मुकाबला कसा करावा यासाठी प्रशासनाने अद्याप काही हालचाली सुरु केल्या असल्याचे दिसून येत नाही. सध्या संपूर्ण प्रशासन हे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुर्ण वेळ कार्यरत असल्याचे दिसून येते आहे.

## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत निरोप समारंभाचा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती.केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.या निरोप समारंभाचे आयोजन इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका चाटे बी.बी.यांच्या नियोजनानुसार शिक्षकांच्या मदतीने केले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. तर प्रमुख पाहुणे म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाच्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक शाळेचे श्री.चौरे रघुनाथ उद्धवराव व शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.चौधरी बी.डी.यांची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांना बोलताना श्री.देशमुख ए.डी.म्हणाले जीवनात कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही त्यासाठी भरपूर कष्ट करा.श्री.यादव व्हि.बी.म्हणाले चांगली



व्यक्ती म्हणून जीवन जीवन जगा,आपले ध्येय निश्चित करा.जे क्षेत्र निवडाल त्यात निपुण व्हा.श्री.चौधरी बी.डी.यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी प्रयत्नरत राहा असे सांगत भावी आयुष्यासाठी मनभरुन शुभेच्छा दिल्या तसेच श्री.चौरे आर.यु.यांनी यश मिळविण्यासाठी अभ्यासातील सातत्य,जिद्द चिकाटी गरजेचे असल्याचे सांगितले. परिसरातील यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे देत यशाचे गमक विद्यार्थ्यांना सांगितले.पहिलीमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी काही विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पाणी असतं यानिरोप समारंभावेळी देखील विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पाणी आहे पण पहिल्या दिवशीचं डोळ्यातील पाणी व आजचं डोळ्यातील पाणी यात फरक आहे,आजचं डोळ्यातील पाणी हे आपल्या शिक्षक,शाळेबद्दल असणारी कृतज्ञता आहे असं मत त्यांनी मांडलं

कार्यक्रम प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेत आलेले अनुभव खूप आत्मीयतेने सांगितले व शाळेतील शिक्षकांचे ऋण व्यक्त केले.त्यांनी दिलेली शिक्षणाची ही प्राथमिक शिदोरी आमच्या उर्वरित आयुष्याचा भक्कम पाया असल्याचे याप्रसंगी नमूद केले.यावेळी सार्थक चव्हाण,सोनाली काळे व संस्कृती जाधव यांनी आपले शाळेतील अनुभव सांगितले व आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती चाटे बी.बी. यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत त्यांचे कौतुक केले व जीवनातील प्रत्येक संकटाचा सामना धैर्याने करा व आपल्या यशस्वी जीवनातून शाळा पालक व देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करा असे सांगितले.


कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी शाळेला आठवण म्हणून भेटवस्तू दिली व अल्पोपहारानंतर ओल्या डोळ्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.क्षीरसागर आर.एस.यांनी केले तर आभार श्री.मस्के जे.आर.यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.डिरंगे जी.बी,श्रीमती ध्वजा गायकवाड व सर्वच शिक्षक वृंदांनी मोलाचे सहकार्य केले.निरोप समारंभावेळी विद्यार्थ्यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत.साश्रू नयनांनी हा निरोप समारंभ संपन्न झाला.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात मोडी लिपी कार्यशाळा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने मोडी लिपीची सात दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली.डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पुरातत्व विभागातील मच्छिंद्र रुपचंद चौधरी यांनी कार्यशाळेत मोडी लिपीचे प्रशिक्षण दिले.

मध्ययुगीन काळातील यादव तसेच मराठा काळात प्रशासकीय भाषा म्हणून मोडी लिपी वापरली जात होती.ऐतिहासिक महत्त्व असलेल्या मोडी लिपीची कार्यशाळा दि १८ मार्च ते २४ मार्च दरम्यान सुंदरराव सोळंके महाविद्यालयात घेण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पुरातत्व विभागातील मोडी लिपी तज्ञ मच्छिंद्र चौधरी यांनी या कार्यशाळेत अतिशय साध्या व सोप्या पद्धतीने प्रशिक्षण दिले. यामध्ये विद्यार्थी,विद्यार्थिनी,शिक्षक,प्राध्यापक यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून सहभाग घेतला. मोडी लिपी कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.बी.आर.डक होते तर मोडी लिपीतज्ञ मच्छिंद्र चौधरी,प्राचार्य डॉ. जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे,इतिहास विभागप्रमुख प्रा. बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना ॲड. बी.आर. डक म्हणले की,मराठा काळात प्रमुख लिपी म्हणून मोडी लिपीची ओळख होती.आज मोडी लिपी शिक्षण घेणे



काळाची गरज असून सद्यस्थितीत जुन्या प्रशासकीय कागदपत्रांचे वाचन करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.जी. के.सानप यांनी मोडी लिपीचे महत्त्व सांगितले. यावेळी उपप्राचार्य डॉ एम.ए.कव्हळे, पुरुषोत्तम जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बालाजी बोडके यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.डॉ अरुण पेंटावार यांनी केले तर आभार प्रा.सुदर्शन स्वामी यांनी मानले.

# पाच वर्षात मका उत्पादन १० दशलक्ष टनापर्यंत वाढवण्याचे लक्ष्य!

## 'फार्म टू फ्यूल' नावाची महत्वाकांक्षी योजना राबविणार

दिल्ली : देशात आगामी काळात मका पिकाचे महत्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. इथेनॉल निर्मिती व्यवसायाची भरभराट झाल्याने, मकाला महत्व प्राप्त झाले आहे. तसेच पोल्ट्री व्यवसायात देखील मकाला मोठी मागणी वाढली आहे. त्यामुळे आता येत्या पाच वर्षांमध्ये सरकारकडून मका उत्पादनात १० दशलक्ष टनांपर्यंत वाढ करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. मका उत्पादनाद्वारे 'फार्म टू फ्यूल' नावाची महत्वाकांक्षी योजना राबविली जाणार आहे. असे भारतीय कृषी संशोधन संस्थेचे वैज्ञानिक अशोक सिंह यांनी म्हटले आहे.

मका हे गहू आणि धान पिकानंतर देशातील तिसरे सर्वात महत्वाचे पीक आहे. २०२२-२३ मध्ये देशात एकूण ३४.६ दशलक्ष टन मका उत्पादन नोंदवले गेले आहे. जे २०२१-२२ मध्ये ३३.७ दशलक्ष टन नोंदवले गेले होते. तर २०२३-२४ मध्ये देशातील मका उत्पादन ३२.४७ दशलक्ष टन इतके नोंदवले गेले होते. सरकारच्या जैवइंधन



धोरणानुसार, येत्या काळात उसापासून इथेनॉल निर्मिती कमी करण्यावर भर दिला आहे. तर इथेनॉलनिर्मितीसाठी अधिकाधिक मका पिकाचा वापर केला जाणार आहे.

इथेनॉल निर्मितीसाठी ऊस, तांदूळ आणि मका यांसारख्या पिकांचा उपयोग केला जाणार आहे. सध्याच्या घडीला देशातील जवळपास २५ टक्के इथेनॉलची निर्मिती उसापासून केली जाते. तर २५ टक्के इथेनॉल निर्मिती अन्नधान्यापासून केली जाते. त्यामुळे सध्या इथेनॉलनिर्मिती वाढवण्यावर भर देण्यासाठी मकाची हमीभावाने सरकारी खरेदी करण्यासाठी भर दिला जात आहे. या नवीन धोरणानुसार, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी वर्ष २०२५-२६ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### नवीन वाण विकसीत करणार

भारतामध्ये गहू आणि धानानंतर मका हे सर्वात महत्वाचे पीक आहे. मकाचा उपयोग देशाची ऊर्जासुरक्षा मजबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे आता मका उत्पादक शेतकऱ्यांना अन्नदाता नाही तर ऊर्जादाता म्हटले जाऊ लागले आहे. सरकारकडून मकाचा उपयोग देशातील इंधन मिश्रणासाठी केला जात आहे. परिणामी आता आगामी काळात मका बियाणे संशोधकांकडून अधिक उत्पन्न देणाऱ्या जातींच्या लागवडीसाठी प्रयत्न केला जाणार आहेत.

# गवळाऊ गाय; जाणून घ्या वैशिष्ट्ये!



देशात वेगवेगळ्या प्रजातीच्या गायी आहेत. वेगवेगळ्या प्रदेशात आढळणाऱ्या गायी तेथील वातावरणास अनुकूल असतात. अशीच विदर्भाचे भूषण म्हणून गौरवली जाणारी गवळाऊ किंवा गौळाऊ गाय विदर्भात प्रसिद्ध आहे. या गायीचे वैशिष्ट्ये : महाराष्ट्रातील विदर्भ व मध्यप्रदेशातील काही भागात ही गाय आढळते. गौळाऊ गोवंश विदर्भाच्या उष्ण हवामानातही शेतीकाम, दूध उत्पादनात सातत्य राखणारा आहे. या गायींची रोगप्रतिकारशक्ती चांगली असून शेतीकामासाठी बैलही उत्तम असतात. गवळाऊ गायी कृष्णाच्या काळातील असल्याचे सांगितले जाते.

शारिरीक वैशिष्ट्ये : ही गाय मध्यम उंचीची, हलक्या बांध्याची, रुंद व लांबट शरीराची असते. डोके अरुंद व खाली निमुळते असते. कपाळ सपाट, डोळे बदामी आकाराचे व उंच असतात. शिंगे आखूड असून काहीशी मागे वळलेली असतात. मान आखूड व खांदा एका बाजूला थोडा झुकलेला असतो.पाय सरळ व मजबूत, पोळ खूपच लोंबती आणि स्तन मध्यम आकाराचे असते. अंगावरील कातडी सैल असते. शेपटी आखूड व रंग पांढरा असतो. बैल चपळ असून शेती व वाहतुकीकरिता उत्तम असतात. गायीचे सरासरी वजन ३३० किलो असते तर बैलाचे वजन ४५० किलोपर्यंत असते. या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय ४८ महिने असते.

उत्पादन क्षमता : ही गाय एका दिवसात सरासरी ५ ते ६ लिटर दूध उत्पादन. दूध देण्याच्या कालावधी २१० २४० दिवसांचा असून सरासरी दुधाचे उत्पादन ४७० ते ७२५ लिटर असते.

# भारतीय गाय ठरली ब्राझीलमध्ये सर्वात महाग ;किंमत ४० कोटी रुपये!

पुणे : महाराष्ट्रासह देशात मोठ्या प्रमाणात शेतकरी दुग्ध व्यवसाय करतात. सध्याच्या घडीला जातिवंत दुधाळ गायींच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. भारतात सध्या ४० ते ७० हजार रुपयांमध्ये दुधाळ गायी उपलब्ध होत आहे. मात्र, आता एखाद्या गायीची किंमत ४० कोटी रुपये आहे. हे ऐकल्यास तुम्हांला नवल वाटल्याशिवाय राहणार नाही. मात्र हे तंतोतंत खरे असून, ब्राझीलमधील एका लिलाव पद्धतीने विकत घेतलेल्या गायीला चक्क ४० कोटी रुपयांची किंमत मिळाली आहे. त्यामुळे ही 'नेलोर' किंवा नेल्लूर प्रजातीची गाय आतापर्यंतची जगातील सर्वात महागडी गाय ठरली आहे.

महागड्या कारपेक्षाही अधिक किंमत : जगातील महागडी कार म्हणून ओळख असलेल्या 'बुगाटी' या कारपेक्षाही ही गाय महागडी आहे. ब्राझील नुकत्याच झालेल्या गायीचा लिलावात 'व्हिएटिना-१९ एफआयव्ही मारा इमोव्हिस' नावाची नेलोर गाय ४.८ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच ४० कोटी रुपयांना विकली गेली आहे. ब्राझीलमध्ये नेलोर गाय व्हिएटिना या नावाने ओळखली जाते. व्हिएटिनाची गायीची लिलावातील किंमत केवळ तिची वैयक्तिक किंमतच दर्शवत नाही. तर जनावरांच्या जागतिक बाजारात नवीन मानक स्थापित करून, जातिवंत गायींची गुणवत्ता सुधारण्यासाठी तिच्या अनुवांशिक गोष्टींची देखील क्षमता दर्शवते.

'नेलोर' गाय ही मूळची भारतीय : 'नेलोर' प्रजातीच्या या गायीचा लिलाव साओ पाउलोच्या अरंडू येथे झाला.




मागील वर्षी या गायीला मिळालेल्या किमतीपेक्षा, यावर्षी या गायीला अधिक किंमत मिळाली आहे. नेल्लोर प्रजातीची ही गायीची जात मूळची भारतातील असून, तिचे नाव आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्याच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. सध्या ती ब्राझीलमधील सर्वात महत्त्वाची गायींच्या जातींपैकी एक बनली आहे. या गायीची नर-मादी पहिली जोडी १८६८ मध्ये जहाजाने ब्राझीलमध्ये पोहचली होती. त्यानंतर १९६० च्या दशकापासून त्या ठिकाणी या भारतीय गायींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

नेलोर गायीचे वैशिष्ट्ये : नेलोर गायीचे वैज्ञानिक नाव बॉस इंडिकस आहे. ही गाय उष्ण हवामान, उत्तम रोग प्रतिकारशक्ती आणि मांसाचा दर्जा यांसारख्या उत्तम गुणांनी परिपूर्ण आहे. ही गाय ताकद, लवचिकता आणि कठीण परिस्थितीत टिकाव धरून राहण्यासाठी ओळखली जाते. त्यामुळे या गाईला उष्णकटिबंधीय भागात अत्यंत महत्त्व आहे. नेल्लोर जातीची कोणत्याही वातावरणात जुळवून घेते. तसेच भरपूर दूध देखील देते. या गायींचे वैशिष्ट्य म्हणजे प्रखर उन्हातही ही गाय आरामात राहू शकते. या गायींच्या अंगावर संपूर्ण पांढरा रंग असतो जो सूर्यप्रकाश परावर्तित करतो. या गायीची त्वचा खूप कठीण असते. परिणामी रक्त शोषणारे कीटक या गायीवर हल्ला करत नाही.


# डिजिटल डॅशबोर्ड; जाणून घ्या शेतकऱ्यांना होणारे फायदे

देशातील शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती, सेवा अन् सुविधांनी सुसज्ज करून सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि आदिवासी कार्यमंत्री अर्जुन मुंडा यांनी कृषी एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटरचे उद्घाटन केले. खरं तर कृषी क्षेत्रातील सर्व डिजिटल नव कल्पनांचा हा मोठा डॅशबोर्ड आहे. अधिकाऱ्यांनी आयसीसीसी चे वर्णन कृषी पद्धतींच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा फायदा घेण्यासाठीच्या एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून केले आहे. देशभरातील शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे, असेही मुंडा म्हणाले.

काय आहे कृषी आयसीसीसी? : आयसीसीसी हा एक तंत्रज्ञान आधारित डॅशबोर्ड आहे, ज्यामध्ये एकाधिक ॲप्लीकेशन्स आणि प्लॅटफॉर्मचा समावेश आहे. शेतकऱ्याला माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी तो तयार करण्यात आला आहे. या डॅशबोर्डचे केंद्र हे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयामध्ये आहे, जे कायदे, धोरण निर्मिती आणि कृषी क्षेत्रातील उपक्रमांच्या अंमल बजावणीसाठी जबाबदार आहे. तापमान, पर्जन्यमान, वाऱ्याचा वेग, पीक उत्पादन याची आयसीसीसी द्वारे माहिती गोळा केली जाते. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, रिमोट सेन्सिंग आणि भौगोलिक माहिती प्रणाली यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.







व्हिज्युअल आउटपूट म्हणून नेमके काय मिळते? : आयसीसीसी मध्ये बसवलेल्या आठ मोठ्या ५५ इंचाच्या एलईडी स्क्रीनवर तुम्ही पीक उत्पादन, दुष्काळी परिस्थिती, पीक पद्धती, नकाशा, टाइमलाइन यासंदर्भातील माहिती दृश्यांमध्ये पाहू शकता. तुम्ही संबंधित ट्रेंड आणि की परफॉर्मन्स इंडिकेटर देखील पाहू शकता. कृषी योजनेबरोबरच प्रकल्प आणि उपक्रमांबाबतची सूचना आणि अभिप्राय प्राप्त करू शकता.

आयसीसीसी सूक्ष्म डेटा संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आणि ते दाखवण्यासाठी कृषी निर्णय समर्थन प्रणालीसह प्लॅटफॉर्म वापरते. आयसीसीसी कडे एक संपर्क केंद्र आणि एक हेल्पडेस्क सुविधासुद्धा आहे. गरज भासल्यास शेतकरी लाभार्थी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधांद्वारे थेट अधिकारी किंवा मंत्री यांच्याशी संवाद साधू शकतात.

आयसीसीसी चे उद्दिष्ट : रिमोट सेन्सिंगसह अनेक माध्यमांतून मिळालेली भौगोलिक माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून शेती क्षेत्राचे सर्वसमावेशक निरीक्षण करता येणार आहे. माती सर्वेक्षणाद्वारे भूखंडस्तरीय डेटा मिळाला आहे. भारतीय हवामान विभागकडून हवामान डेटा, डिजिटल पीक सर्वेक्षणातील पेरणी डेटा, कृषी नकाशाकडून शेतकरी आणि शेतीशी संबंधित डेटा, जमिनीच्या भू टॅगिंगसाठीचे अर्ज, युनिफाइड पोर्टल फॉर ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्सवरून मार्केट इंटेलिजन्स माहिती आणि सामान्य पीक अंदाज सर्वेक्षणाकडून उत्पन्न, अंदाज डेटा एकत्रित केला जातो. डेटाचे एकात्मिक व्हिज्युअलायझेशनमुळे इकोसिस्टमद्वारे जलद आणि कार्यक्षम निर्णय घेण्यास मदत मिळते. तसेच तुम्ही पीएम किसान चॅटबॉटशी जोडले जाऊ शकता.

शेतकऱ्याला शेती संबंधी सल्ला देता येणार

आयसीसीसी च्या माध्यमातून एक इकोसिस्टम तयार केले जाऊ शकते, ज्याद्वारे शेतकरीस्तरीय सल्लागार किसान ई-मित्र, पीएम किसान लाभार्थ्यांसाठी विकसित केलेल्या चॅटबॉट यांसारख्या ॲप्सद्वारे निर्माण केले जाऊ शकतात. मशीन लर्निंग आधारित प्रणाली शेतकऱ्याला त्याच्या/तिच्या मोबाईल नंबर किंवा आधारद्वारे ओळखू शकणार आहेत.

तसेच जमिनीच्या नोंदी, पीक नोंदणीमधून ऐतिहासिक पीक पेरणीची माहिती, आयएमडी कडील हवामान डेटा इत्यादींद्वारे प्राप्त झालेल्या शेतकऱ्याच्या शेतातील माहितीशी मिळतीजुळती असणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यासाठी स्थानिक भाषेत त्यांना समजण्यासारखा सल्ला तयार केला जातो. यासाठी प्रणाली भाषिनी प्लॅटफॉर्मचा वापर करतात, जे अनेक भारतीय भाषांमध्ये भाषांतर करण्यास परवानगी देते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९९ : शिख धर्मगुरू श्री.गुरू गोबिंद सिंघ यांनी खालसा पंथ ची स्थापना केली.
१७२९ : थोरले बाजीराव पेशवे यांनी जैतपूर येथे महंमदशहा बंगश याचा पराभव केला.
१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१८४२ : अमेरिकन शल्यविशारद डॉ. क्रॉफर्ड लाँग यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी इथर या द्रव्याचा प्रथमच वापर केला.
१८५६ : पॅरिसचा तह झाल्याने क्रिमियन युद्ध संपले.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९२९ : इंग्लड ते भारत अशी विमानमार्गे साप्ताहिक टपालसेवा सुरु करण्यात आली.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९३९ : हेइंकेल १०० ह्या सैनिकी विमानाने ७४५ किमी / ताशी वेगाने उडण्याचा विक्रम केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४४ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी सोफिया, बल्गेरिया येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४६ : फ्रांसिस गोया, स्पॅनिश चित्रकार.
१८३२ : व्हिंसेंट व्हान गॉ, डच चित्रकार.
१८५३ : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै १८९०)
१८९४ : इल्युशीन विमान कंपनी चे निर्माते सर्जी इल्युशीन यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७७)
१८९५ : सोविएत युनियनचे अध्यक्ष निकोलाय बुल्गानिन यांचा जन्म. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९७५)
१८९९ : बंगाली लेखक शरदेंदू बंदोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९७०)
१९०६ : भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९६५)
१९०८ : अभिनेत्री देविका राणी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९९४)
१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३८ : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम चे स्थापक क्लाउस स्च्वाब यांचा जन्म.
१९४२ : भाषातज्ज्ञ, कोशकार, लेखक आणि कवी वसंत आबाजी डहाके यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)
१९७७ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक अभिषेक चोब्बे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान (जन्म: )
१६६५ : मुरारबाजी, पुरंदर किल्ल्याला वेढा घालणाऱ्या दिलेरखानाशी झुंज दिलेला
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९५२ : भूतानचे २ रे राजे जिग्मे वांगचुक यांचे निधन.
१९६९ : कवी व समाजसेवक वासुदेव गोविंद मायदेव यांचे निधन. (जन्म: २६ जुलै १८९४)
१९७६ : रघुवीर शंकर मुळगावकर, विख्यात चित्रकार, रंगसम्राट.
१९८१ : रीडर्स डॉजेस्ट चे निर्माते डेविट वलास यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८८९)
१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९३ : एस. एम. पंडित, भारतीय चित्रकार.
१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)
२००२ : आनंद बक्षी, हिंदी चित्रपटगीतकार.
२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: ? ? १९४७)
२००५ : भारतीय लेखक आणि चित्रकार ओ. व्ही. विजयन यांचे निधन. (जन्म: २ जुलै १९३०)
२०१२ : कॅनेडियन-भारतीय समाजशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक अक्किला बेर्लास किंनी यांचे निधन.

# ठिय्या मांडताच महावितरण ताळ्यावर

## जिल्ह्यातील १२८३ शेतकऱ्यांच्या सौरपंप अप्रोव्हलची थांबलेली प्रक्रिया तत्काळ सुरू

बीड । प्रतिनिधी
प्रधानमंत्री कुसुम-ब योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना ३ एच.पी., ५ एच.पी. व ७.५ एच.पी. क्षमतेचे सौर कृषीपंप देण्याचे धोरण शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आले. महा कृषी ऊर्जा अभियान द्वारे राबविलेल्या या योजनेत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. मात्र या शेतकऱ्यांच्या अर्जांना अप्रोव्हल मिळत नसल्याने काल शेतकऱ्यांनी धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यालयाबाहेरच ठिय्या मांडला. या ठीय्याच्या झटक्याने महावितरण प्रशासन ताळ्यावर आले अन्? प्रक्रियेची सुरुवात झाली.

ही योजना मुख्यतः दुर्गम क्षेत्रात जेथे वीज जोडणी पोहोचलेली नाही त्यांच्यासाठी आहे. शासनाने जाहीर केलेल्या धोरणानुसार शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज मोठ्या प्रमाणात केले. मात्र हे अर्ज अप्रोव्हल करण्याची प्रक्रिया उप कार्यकारी अभियंता (सोलार प्रोजेक्ट) चमाटे यांच्याकडे होती. सबंधित



अधिकाऱ्यांकडून याबाबत दिरंगाई होत असल्याने अर्ज प्रलंबित राहू लागले होते. याबाबत संपर्क केला असता आज करू, उद्या करू असे उत्तरे शेतकऱ्यांना मिळू लागले व कामही मार्गी लागत नव्हते. शेतकऱ्यांनी नुसत्या चकरा मारायच्या मात्र प्रक्रिया खोळंबलेलीच असल्याने हताश होऊन काल महावितरण कार्यालय, जालना रोड येथे प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांनी शेतकरी नेते धनंजय गुंदेकर यांच्यासह कार्यालयाबाहेर काम मार्गी लागेपर्यंत थांबायचे या भूमिकेतून ठिय्याच मांडला.

यावेळी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्काळ दखल घेत ऑनलाईन अप्रोव्हल प्रक्रिया सुरू करण्यासाठी ४ अधिकाऱ्यांची तत्काळ नेमणूक केली. यावेळी अप्रोव्हल सह शेतकऱ्यांच्या क्युरी व इतर प्रशासकीय कामांना मदत व्हावी म्हणून तत्काळ मदतीसाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. जिल्ह्यातील १२८३ शेतकऱ्यांना तारीख निहाय अप्रोव्हल हे येत्या २ ते ४ दिवसांत मिळण्यास सुरूवात होईल असे आश्वासन महावितरण कडून देण्यात आले. धनंजय गुंदेकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अजय सुरवसे यांनीही याबाबत पाठपुरावा केला. यावेळी गणेश काळे, जालिंदर काकडे, सचिन कुटे, पिनु साळुंकेसह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य आणि ब्लँकेटचे वाटप

शिरूर : निराधार आणि निराश्रीत मुलांचा सांभाळ करणाऱ्या मातोरी येथील सेवातीर्थ सामाजिक प्रकल्पात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना गुरुवारी शैक्षणिक साहित्य आणि ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.स्वराज बहुउद्देशीय संस्था,बीडच्या वतीने या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी पत्रकार गोकुळ पवार यांच्यासह भरत पानसंबळ,सामाजिक कार्यकर्ते तथा सर्पमित्र महेश औसरमल आणि सेवातीर्थचे संस्थापक सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती.सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आपणही समाजाचे काही तरी देणे लागतोत या अनुषंगाने बीड येथील स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विधवा महिलांना साडीचोळी वाटप,गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्यासह आणि ब्लँकेटचे वाटप करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.त्याचाच एक भाग म्हणून गुरुवारी सेवातीर्थ येथील गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्यासह ब्लँकेट वाटप करण्यात आले.

### १० वी १२ वी इयत्तेच्या खेळाडुंनी गुणवाढ प्रस्ताव सादर करावेत

बीड: जिल्यातील इयत्ता दहावी व बारावीमध्ये शिक्षण घेणा-या खेळाडुंसाठी जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय आंतराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी अथवा प्राविध्य प्रविण्य प्राप्त केलेल्य खेळाडुंना सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यास सन २०२३-२४ या वर्षातील क्रीडा स्पर्धेत जिल्हा,विभाग स्तरीय स्पर्धेत प्रविण्य व राज्य, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेल्या सहभागी झालेल्या खेळाडूंना क्रीडा सवलत गुणाचा लाभ घेता येईल. तसेच इयत्ता १२ वीमध्ये शिकत असलेल्या खेळाडु विद्यार्थ्यांस सन २०२३-२४ या वर्षातील क्रीडा स्पर्धेत जिल्हा,विभाग स्तरीय स्पर्धेत प्राविण्य व राज्य, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेल्या अथवा सहभागी झालेल्या उच्चतम स्तराच्या स्पर्धेचा लाभ क्रिडा सवलत गुणासाठी घेता येईल. यासाठी विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव प्राचार्य, मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह शारिरिक शिक्षक यांच्या मार्फत दि.३१ मार्च २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे सादर करावेत विहित मुदतीनंतर आलेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही किंवा उपरोक्त मुदतीत कोणत्याही प्रकारची वाढ केली जाणार नाही, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण यांनी केले आहे.

### कोषागार कामकाजासाठी बँक शाखा सुरु राहणार

बीड:सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी जिल्हयातील जिल्हा कार्यालय, बीड व त्या अधिनस्त सर्व उपकोषागार कार्यालये शासनाचे आर्थिक व्यवहार सांभाळणा-या स्टेट बँक इंडिया मुख्य शाखा, बीउ अंबाजोगाई, आष्टी, गेवराई, केज, माजलगाव, पाटोदा, परळी (वै), धारुर, वडवणी आणि शिरुर कासार या बँका दि. ३१ मार्च २०२३ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत शासकीय व्यवहार पार पाडण्यासाठी चालू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिले आहेत. प्रस्तुत अधिकारी बँक व्यवस्थापकांनी याची नोंद घ्यावी, आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे या आदेशात नमूद केले आहे.

### वाहन नोंदणी सुटीतही होणार

बीड :सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील महसुली उदिष्ट साध्य करण्यासाठी तसेच मार्च अखेर असल्यामुळे नवीन वाहनांची मोठय प्रमाणात खरेदी होण्याची शक्यता असल्याने नवीन नोंदणी व त्या अनुषंगाने कर वसुली करण्यासाठी दि. २९ मार्च ते ३१ मार्च २०२४ रोजी कामकाज सुरु ठेवले आहे.सर्व वाहन विक्रेते व नागरिकांनी दि. २९ ते ३१ मार्च २०२४ या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयात नवीन वाहन नोंदणी व कर वसुलीचे कामकाज सुरु ठेवण्यात आले असल्याचे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई यांनी केले आहे.

### कोषागार कार्यालय व शासकीय व्यवहार पाहणा-या बँका ३१ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत सुरु राहणार

बीड: जिल्हयातील सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी दि. ३१ मार्च २०२४ रोजी बीड कोषागार कार्यालय तसेच स्टेट बँक ऑफ इंडियांच्या शासकीय व्यवहार करणा-या सर्व शाखा रात्री १२.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्यात येणार आहेत. जिल्हयातील सर्व अहरण व संवितरण अधिकारी यांना अचूक देयक कार्यालयीन वेळेत सादर करुन दि. ३१ मार्च २०२४ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत धनादेश प्राप्त करुन घ्यावेत त्यानंतर सन २०२३-२०२४ चे आर्थिक व्यवहार बंद करुन नवीन आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या वर्षाचे लेखे सुरु केले जातील याची सर्व अहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे जिल्हा कोषागार अधिकारी बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात प्रमाणपत्र अभ्यासक्रम

पाटोदा - येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २८ मार्च रोजी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने १७ जानेवारी ते १७ फेब्रुवारी या कालावधीत 'बायोफर्टीलायझर्स अँड ऑरगॅनिक फर्टीलायझर' या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात आला. अभ्यासक्रमास २४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या अभ्यासक्रमाचा समारोप कार्यक्रम शुक्रवारी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य किशोर मचाले, उपप्राचार्य गणेश पाचकोरे, डॉ. अभय क्षीरसागर उपस्थित होते.समारोप कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख ज्योती क्षीरसागर यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाविषयी थोडक्यात माहिती देत जैविक खतांचे शेतीमधील महत्व स्पष्ट केले. याप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रोफेसर गणेश पाचकोरे यांनी केले.

# व्यसन मुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान

## जयभीम महोत्सव : सहभागी होण्याचे समितीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी
अवघ्या विश्वात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होते. त्या अनुषंगाणे बीड सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत यजभिम महोत्सव साजरा होतो आहे. व्यसन मुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान राबवून जयभीम महोत्सवाला सुरुवात होणार आहे. या व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.

बीडमध्ये स्वबळावर साजरा होणारा जयभीम महोत्सव एक आदर्श महोत्सव बनला आहे. यंदाच्या जयभिम महोत्सवाची सुरुवात व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान राबवून होणार आहे. पूज्य भिक्खू धम्मशिल थेरो यांच्या हस्ते सुरुवात आणि सांगता होणार आहे. सोमवार (दि.१) पासून (दि.५) एप्रिल पर्यंत बीड शहरांतील विविध बौद्ध विहारात हा उपक्रम राबविला जातो आहे. त्यामुळे व्यसन मुक्तीकडून शिक्षणाकडे अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयभिम उत्सव समितीने केले आहे. बीड शहरातील पूरग्रस्त कॉलनी येथील जयभिम बुद्ध विहार येथे सोमवार (दि.१) एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता, मंगळवार (दि.२) एप्रिल रोजी प्रकाश आंबेडकर नगर येथील डॉ.जगदीश वाघमारे निवास सायंकाळी ६ तर रात्री ७ वाजता राजुरी वेस येथील भिमराज नगर बुद्ध विहार तसेच बुधवार (दि.३) एप्रिल रोजी जयभिम नगर मोंढा रोड येथील जयभीम नगर बुद्ध विहार सायंकाळी ६ वाजता तर रात्री ७:३० वाजता पोचीराम कांबळे नगर येथील समाज मंदिर चांदणे वस्ती, गुरुवार दि.(दि.४) एप्रिल रोजी इंदिरा नगर बुद्ध विहार सायंकाळी ६ वाजता तर रात्री ७:३० वाजता माळीवेस येथील बुद्ध विहार, शुक्रवार (दि.५) एप्रिल रोजी बलभीम नगर सायंकाळी ६ वाजता तर रात्री ७:३० वाजता नागोबा गल्ली येथील सम्यक संकल्प बुद्ध विहार येथे सांगता होणार आहे.

# शारदा विद्या मंदिर तालुक्यात प्रथम उपक्रमशील विद्यार्थ्यांचा गौरव



गेवराई । प्रतिनिधी
राज्यशासनाचा नुकताच घेण्यात आलेला उपक्रम मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये तालुकास्तरीय गुणाानुक्रमामध्ये शारदा विद्या मंदिर गेवराई या विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला, त्या अनुषंगाने विद्यालयामध्ये उपक्रमशील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला, राज्य शासनाने राबवलेल्या मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यासाठी राज्य शासनाच्या शालेय विभागाकडून नियमावली देण्यात आली होती, याला अनुसरून शारदा विद्या मंदिर शाळेतील वर्षभर विविध उपक्रमात सहभागी असलेले विद्यार्थी व त्यांची उपक्रमातील दर्जेदार कामगिरी व त्यांची कल्पकता यामुळे शारदा विद्या मंदिरने तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला, भविष्यात या विद्यार्थ्यांना उपक्रम शीलतेत अधिकाधिक रुची निर्माण व्हावी, म्हणून शाळेच्या वतीने सातत्याने नवनवीन उपक्रम विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जातात.

आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना आदरणीय प्राचार्य राजेंद्र जगदाळे सरांनी सांगितले की, कुठलाही उपक्रम असो तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देत असतो, विविध उपक्रम राबवत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाचा पाया मजबूत होतो, त्यापैकीच आज अगदी अभिमानाने सांगावसं वाटतं, राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत शारदा विद्या मंदिरने तालुक्यामध्ये जो प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान मिळवला, तीच खरी आपल्या यशाची पावती म्हणावी लागेल. तदनंतर शालेय उपक्रमात सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, त्यापैकी खालील विद्यार्थी अथर्व चंद्रशेखर शिंदे, देवेंद्र शाम जोशी, शिवराज संभाजी काकडे, मृण्मयी वैजिनाथ रुकर, जानवी दशरथ पोपळे, शौर्य सर्वोत्तम शिंदे, अलोक रोहित मडके, अमित राम कुरकुटे इत्यादी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती, प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधर पवार, दिगंबर आर्दड, तर मुख्य मार्गदर्शक म्हणून सदानंद कुलकर्णी,जरांगे,सातपुते,पठाण,अमर शिंदे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन तळतकरयांनी केले, व उपस्थिताचे आभार मुरलीधर पवार यांनी मानले.. त्याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतीयोध्दा जोतिराव' हे नाटक इतिहास घडवील-राऊत

बीड । प्रतिनिधी
महात्मा फुलेंच्या जीवनावर यापूर्वी झालेल्या नाटकांच्या तुलनेत 'क्रांतीयोध्दा जोतिराव' हे डॉ. सतीश साळुंके लिखित आणि दिग्दर्शित नाटक मराठी रंगभूमीवर इतिहास घडवील असे प्रतिपादन अॅड.सुभाष राऊत यांनी केले. परिवर्तन तर्फे जागतिक रंगभूमी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. पप्पू कागदे होते.

आरंभी दीपप्रज्वलन व नटराज पूजन करण्यात आले. याप्रसंगी 'क्रांतीयोध्दा जोतिराव' या नाटकाच्या संहितेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. व्यासपीठावर जेष्ठ अभिनेत्री डॉ. उज्वला वनवे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवर्तनचे अध्यक्ष सतीश साळुंके यांनी केले. आपल्या भाषणात अॅड. राऊत पुढे म्हणाले की, प्रस्तुत नाटकाचे संपूर्ण राज्यभर प्रयोग करण्याचा मानस असून त्यामुळे महात्मा फुलेंचे वास्तविक चरित्र राज्यासमोर येईल. अध्यक्षीय समारोप करताना पप्पू कागदे म्हणाले की, नाटकामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. डॉ. साळुंके हे मनोरंजन म्हणून नाटक करत नाहीत तर ती त्यांच्या जगण्याची भूमिका आहे. डॉ. साळुंके यांचे नाटक व इतिहास क्षेत्रातले कार्य बीड जिल्ह्याला अभिमानास्पद आहे. डॉ. उज्वला वनवे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित 'क्रांतीयोध्दा जोतिराव' हे नाटक पूर्ण शक्तीनिशी करण्याचे आवाहन कलावंतांना केले. याप्रसंगी राज्यनाट्य स्पर्धा व बालनाट्याच्या अंतिम स्पर्धा बीडला आयोजित करून त्याचे उत्कृष्ट संयोजन केल्याबद्दल समन्वयक मुकुंद धुताडमल यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दीपा शेळके यांनी केले तर अण्णासाहेब गडदे यांनी आभार मानले. याप्रसंगी दीपक सरवदे, नितीन धायगुडे, मुकुंद धुताडमल,प्रा. प्रवीण निसर्गंध,अण्णासाहेब गडदे, प्रवीण राठोड, सावित्री कांबळे, श्रद्धा वाघुंबरे,आर्या रायते, रिया चोपडे, नीरज हुलजुते यांच्यासह परिवर्तनचे अनेक कलावंत उपस्थित होते.

# जागतिक रंगभूमी दिन हा नाट्य कलेचा उत्सव - डॉ. रामटेके

बीड । प्रतिनिधी
जागतिक रंगभूमी दिनाच्या माध्यमातून आपल्याला वेगवेगळ्या संस्कृती व परंपरा जाणून घेण्याची संधी मिळते तसेच हा दिवस सामाजिक विषयांवर विचार करायला लावणारा आणि उत्तम समाजाच्या निर्मितीसाठी प्रेरणा देणारा दिवस असून नाट्य कलेचे महत्व अधोरेखित करणारा व नाट्य कलेचा उत्सव साजरा करण्याचा दिवस असल्याचे प्रतिपादन सौ.के.एस.के. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. दुष्यंता रामटेके यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २८ मार्च रोजी जागतिक रंगभूमी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे, प्रसिद्धी प्रमुख प्रा.संदीप परदेशी, नाट्यशास्त्र विभागाचे प्रा. केशव भागवत, प्रा. प्रविण निसर्गंध,प्रा. व्यंकटेश राऊत, कार्यालय अधीक्षक किसन सागडे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांनी या दिनानिमित्त नाट्य कलावंतांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा-डॉ.कैलास दौंड

शिरूर। प्रतिनिधी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिफळेवस्ती,केंद्र मानूर येथे ८ वी मधील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभासह छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्तिक जयंती उत्सव संपन्न झाला.या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.कैलास दौंड,साहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव हे उपस्थित होते.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात शिरूर कासार तालुक्यात द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिफळे वस्ती शाळेने मिळविल्याबद्दल मान्यवरांनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या.निमित्त होते निरोप समारंभ व जयंती उत्सवाचे.आठवी वर्गाला निरोप देताना शाळेतील वातावरण भावनिक झाले.मुलांनी शाळेने दिलेले विविध अनुभव,गुरुजनाप्रती असलेले भाव व्यक्त करत आठवणींना उजाळा देत मागील आठवणी ताज्या केल्या.



मनात जिद्द ठेवत प्रयत्नाची पराकाष्ठा करा यश निश्चित मिळेल.व्यसनाला दूर ठेवा.९ वी ते १२ वी या टप्प्यात खूप अभ्यास करा व अंतिम ध्येय मिळवा असे विचार शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या.हा सोहळा सुख दुःख मिश्रित असतो.मुलांनो कष्टाशिवाय यश मिळत नाही नेहमी कष्ट करा.जीवनात संस्काराला महत्व द्या,असे विचार डॉ.विठ्ठल जाधव यांनी व्यक्त करत आपल्या बाल कवितांनी मुलांची मने जिंकली.त्यांच्या अटर का फटर या कवितेने मुलामध्ये धूम उडाली.मुलांच्या भाषेत साभिनय सादरीकरणाने कवितेला अप्रतिम दाद मिळाली. क्षणाचा सहवास जीवनभर टिकू शकतो.आई वडिलांची वेदना,कष्ट समजले की यश मिळवण्याचा मार्ग सोपा होतो.तुम्ही सर्वजण ग्रामीण भागातील आहात आणि ग्रामीण मुलामध्ये प्रचंड ऊर्जा असते.कोणत्याही ऋतूत व कोणत्याही समस्येवर ग्रामीण मुले मात करतात.लेकरानो आपल्या आई वडिलांचा हात कधीतरी हातात घ्या तो किती खरबुड आहे किती झिजला हे समजून घ्या आणि भविष्यात त्या झिजलेल्या हातांचे आधार बना असे विचार व्यक्त करत डॉ.कैलास दौंड यांनी मांडत माझे रान या कवितेने भाषणाचा समारोप करत सर्वांची मने जिंकली.शिवांजली मानूरकर व आराध्या गीते ७ वी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर ताजुद्दिन शेख सर यांनी आभार मानले.दीपक देठे,संतोष गर्जे,अंकुश खेडकर,दत्तू शिरसाट,शीतल काळदाते यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# सामाजिक बांधिलकी जोपासून शिवजयंती केली साजरी

## परळीतील रानबा महाराज मंदिराचे अपूर्ण काम पूर्णत्वास नेण्याचा संकल्प

परळी
जगाच्या पाठीवर आदर्श राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव असे राजे आहेत की ज्यांनी आपल्या राज्यातील शेवटच्या घटकापर्यंतच्या नागरिकांच्या प्रगती आणि सुरक्षेचा विचार केला आहे. छ.शिवाजी महाराज हे आदर्श राजे असून त्यांच्या सुराज्याचे विचार आजही तेवढेच अनुकलनीय असून राजांच्या सुराज्य धोरणावर जर आपण काम केले तर महाराष्ट्र नेहमीच जनतेचे राज्य म्हणून ओळखले जाईल असे मत विविध व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड यांनी व्यक्त केले. परळी शहरातील मलिकपुरा, पंचायत समितीसमोरील संतश्री रानबा महाराज यांच्या मंदिराचे अपूर्ण काम गुढीपाडव्यापर्यंत पूर्णत्वास नेण्याचा संकल्प करण्यात आला. वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी शहरातील विविध मंदिरांची केलेली स्वच्छता मोहीम लक्षात घेवून त्यांना विविध प्रकारचे साहित्य प्रदान करण्यात आले. दरम्यान जय महाराष्ट्र शिवजयंती उत्सव समितीच्या या



सामाजिक कार्याचे परळी शहरातील नागरिक, व्यापारी बांधवांनी कौतुक केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज गुरूवार दिनांक २८ मार्च रोजी परळी येथे जय महाराष्ट्र शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने मोंढा मैदानावर साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आई तुळजाभवानी, जिजाऊ माँसाहेब, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन परळी विविध व्यापारी महासंघाच्या पदाधिकार्यांच्या हस्ते करण्यात आले. तर परळी शहरातील विविध वृत्तपत्रांच्या संपादक महादेयांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले. जय भवानी जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, भारत माता की जय, वंदे मातरम, बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो या घोषणेने परिसर दुमदुमून गेला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विविध व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड,संपादक राजेश साबणे, संपादक बालासाहेब कडबाने पाटील, संपादक प्रकाश सुर्यकर, पत्रकार संतोष जुजगर, अनंत कुलकर्णी, व्यापारी गुलाब अप्पाराव शेटे, बंडू गरूड, ब्रिजलालजी मुंदडा, विष्णुदासजी बियाणी, फडकरी अप्पा, सुरेश ठक्कर, रामेश्वर महाराज कोकाटे, वृद्ध कलावंत संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास काटे,यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज शिवजयंतीचे वातावरण अधिक भगवेमय व उत्साहवर्धक झालेले होते. कार्यक्रमाचे संचलन जय महाराष्ट्र शिवजयंती उत्सव समितीचे प्राचार्य अतुल दुबे तर आभार प्रदर्शन श्रीनिवास उर्फ मुन्ना सावजी यांनी केले. याच कार्यक्रमात परळी शहररातील मलिकपुरा, पंचायत समितीसमोरील असलेले संतश्री रानबा महाराज यांचे मंदिर असून या मंदिराचे अपूर्ण राहिलेले काम गुढीपाडव्यापर्यंत पुर्णत्वास नेण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी शहरातील विविध मंदिरांची केलेली स्वच्छता मोहीम लक्षात घेवून त्यांना विविध प्रकारचे साहित्य प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात ध्येय मंत्र व प्रेरणामंत्राने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमास शहर व पंचक्रोशीतील शिवप्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय महाराष्ट्र शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मोहन परदेशी, कार्याध्यक्ष बबन ढेंबरे,श्रीनिवास सावजी, रमेशअण्णा चौंडे, सोमाने , प्रकाश देवकर, सचिन मुंडे, दिनेश लोंढे,माऊली मुंडे, नवनाथ वरवटकर, किशन बुंदिले ,संस्कार पालीमकर, योगेश जाधव मनीष जोशी,अमित कचरे, दीपक जोशी, अजय आघाव,गोपीनाथ मुंडे, ईश्वर गायके,नवल वर्मा सिद्धार्थ गायकवाड शिवम मोहिते, वरद कुलकर्णी लक्ष्मण मुंडे, योगेश घेवारे, अनिल घोबाळे,योगेश जाधव, जगदीश पवार, नरेश मैड, सोमनाथ गायकवाड, अभिजित पवार,करण कुसळे, विनित वानरे, रवी देवकर, मोहित जोशी, बालाजी सातपुते, हनुमान जाधव, नागनाथ तूपसौंदर, कैलास तूपसौंदर, जालिंदर फड यांनी प्रयत्न केले.



# पंकजाताई मुंडेंचा अंबाजोगाईत मतदारांशी थेट आत्मिय संवाद

## अंबानगरीने केले लेकीचे ठिक ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत; योगेश्वरी देवीच्या दर्शनाने सुरू केला संवाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे हया सध्या झंझावाती दौऱ्याने बीड जिल्हा ढवळून काढत आहेत. काल केजनंतर आज अंबाजोगाईत दिवसभर त्यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत थेट संवाद साधला. ठिक ठिकाणी त्यांचं उत्स्फूर्त स्वागत झालं. सकाळी श्री योगेश्वरी देवीचे दर्शन घेऊन त्यांनी दौऱ्याला सुरवात केली.

शहरात आगमन होताच पंकजाताईंनी श्री.योगेश्वरी देवीचे दर्शन घेतले. याप्रसंगी प्रसारमाध्यमांशी संवाद साधतांना पंकजाताई म्हणाल्या, जिल्ह्यातील ज्या ज्या ठिकाणी जाईल तिथे भावना व श्रद्धेने नतमस्तक होत असते.दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे व माझी आई नवरात्रात अष्टमीला श्री.योगेश्वरी देवीच्या दर्शनाला येत असत ही आमच्या परिवाराची परंपरा राहिली आहे. जनसेवेचे बळ मिळावे असे देवीकडे आशीर्वाद मागितले. जनता जनार्दनाचे माझ्या पाठिशी सदैव आशिर्वाद आहेत. लोकांशी संवाद साधत असताना त्यांची देहबोली मला विजयी आशीर्वाद प्रदान करणारी आहे. जनतेचा अभुतपूर्व प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे आपल्याला सन्मानजनक विजयाचा विश्वास असल्याची प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.यावेळी आ.नमिताताई मुंदडा,अक्षय मुंदडा,गयाताई कराड आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.









**मतदारांच्या भेटीगाठी ; ज्येष्ठांशी आपुलकीचा संवाद ; पापा मोदींनी केलं स्वागत**

पंकजाताई मुंडे यांनी शहरात दिवसभर फिरून विविध क्षेत्रातील नागरिकांच्या भेटी घेण्यावर जोर दिला. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, वकील, ज्येष्ठ नागरिक आदी क्षेत्रातील नागरिकांना भेटून आपुलकीचा संवाद साधला . सर्वच ठिकाणी त्यांचं जोरदार स्वागत झालं. माजी नगराध्यक्ष राजकिशोर(पापा) मोदी यांच्या निवासस्थानी मोदी परिवाराकडून अतिशय जिव्हाळ्याने त्यांचं स्वागत करण्यात आलं. यावेळी भेटीदरम्यान कौटुंबिक तसेच लोकसभेच्या दृष्टीने अंबाजोगाई शहर व तालुक्यातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंकडून आदर्श आचारसंहितेचा भंग

**अमरावती । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केला असून निवडणुक आयोगाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्राचे प्रकरण सुप्रीम कोर्टात अद्याप प्रलंबित आहे, त्याचा निकाल लागलेला नाही, असे असताना बावनकुळे यांनी निकाल लागला असल्याचा दावा करुन मा. न्यायालयाचा अवमान केला आहे, हा गंभीर गुन्हा असून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली.

यासंदर्भात काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली असून या तक्रारीत असे म्हटले आहे की, २८ मार्च २०२४ रोजी खासदार नवनीत राणा यांच्या भारतीय जनता पक्षातील प्रवेशावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी, सुप्रीम कोर्टाने खासदार नवनीन राणा प्रकरणी निर्णय दिलेला आहे, अशा प्रकारचा चुकीचा व दिशाभूल करणारा खोटा दावा केला आहे. अशा पद्धतीचे विधान जाणीवपूर्वक करुन खोटी माहिती पसरवली जात आहे, हा प्रकार मतदारांवर प्रभाव टाकणारा आहे तसेच आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून भारतीय दंड संहिते अंतर्गत गुन्हा







**अतुल लोंढे यांची तक्रार, कारवाई करण्याची मागणी**

आहे, असेही सांगितले. पुढे बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, नवनीत राणा या अमरावती लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत विजयी झाल्या, अमरावतीची जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव आहे. या मतदारसंघातून विजयी झालेल्या नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र मुंबई हायकोर्टाने २०२१ मध्ये रद्द ठरवत दोन लाखांचा दंडही ठोठावला. त्यानंतर नवनीत राणा यांनी हायकोर्टाच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. २८ फेब्रुवारी २०२४ च्या सुनावणीनंतर सुप्रीम कोर्टाने निकाल राखून ठेवलेला आहे, असे असतानाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी निकाल लागलेला आहे, असे खोटे सांगून जनतेची दिशाभूल केली आहे, असा आरोप केला.

# बाबुराव पोटभरेंचा 'शाक्य बंगला' बीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू!

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने माजलगाव येथील बाबुराव पोटभरे यांचा शाक्य बंगला

बीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू ठरताना दिसत आहे. महाविकास आघाडीचे संभाव्य उमेदवार म्हणून चर्चित असलेले बजरंग सोनवणे यांच्या नंतर आज शिवसंग्राम संघटनेचे स्व.विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनीही बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य बांगल्यावर भेट दिली.

आक्रमक,सडेतोड वक्तृत्व शैली, निडर आणि प्रभावशील नेतृत्व म्हणून बीड जिल्ह्यात बाबुराव पोटभरे यांची ठळक ओळख आहे. गेल्या कित्येक वर्षापासून चळवळीत काम करणाऱ्या या नेत्याची जिल्ह्यासह मराठवाड्यातल्या तरुणात क्रेझ




आहे.प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या सभांना हजारोंची गर्दी उसळून येते. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत माजलगाव येथील बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य बंगल्याला विशेष महत्त्व आले आहे.लोकसभेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असणारा प्रत्येक उमेदवार शाक्य बंगल्यावर हजेरी लावत आहेत.निवडणुकीत विजय पदरात पाडून घेण्याचं हक्काचं ठिकाण म्हणून पोटभरे यांचा शाक्य बंगला आज घडीला बीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.बजरंग सोनवणे यांच्या भेटीनंतर बुधवार दि.२७ रोजी संध्याकाळी ज्योतीताई मेटे यांनीही शाक्यबांगल्यावर बाबुराव पोटभरे यांची भेट घेतली.या भेटीतून कोणते राजकीय समीकरणे जुळऊन येतील याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून आहे.

# '४०० पार'ची स्वप्ने पाहणाऱ्यांनी तरुणांची स्वप्ने चिरडली

**मुंबई । प्रतिनिधी**

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने (एनसीपी- एसपी) मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. देशातील बेरोजगारांमध्ये ८३ टक्के युवक असल्याचे या अहवालात म्हटले आहे. 'चारसौ पार'ची स्वप्ने पाहणाऱ्यांनी तरुणांची स्वप्ने पार चिरडून टाकली असल्याची टीका एनसीपी-एसपीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे.

आमदार जयंत पाटील यांनी यासंदर्भात ट्वीट केले आहे. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने दिलेल्या अहवालानुसार देशातील बेरोजगारांमध्ये ८३ टक्के युवक आहेत. त्यातही सुशिक्षित बेरोजगारांची संख्या अधिक आहे. २००० सालच्या तुलनेत २०२२ साली सुशिक्षित बेरोजगारांची संख्या जवळजवळ दुपटीने वाढून ६५.७ टक्के झाली आहे. हा रिपोर्ट जितका



धक्कादायक आहे तितकाच दुर्दैवी असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले आहे. सध्या सर्व बाबींची गॅरंटी घेणारे केंद्र सरकार, देशातील तरुणांना दशकभरापूर्वी दिलेली रोजगाराची गॅरंटी पूर्ण करू शकले नाही, हे यातून स्पष्ट होते. 'मेक इन इंडिया' आणि 'मेड इन इंडिया' या योजनांच्या नावाखाली केंद्र सरकारने फक्त स्वत:चे मार्केटिंग केले, स्किल डेव्हलपमेंटच्या नावाखाली कोटी-कोटी रुपयांच्या घोषणा केल्या. पण प्रत्यक्षात सरकार देशातील तरुणांच्या कौशल्याचा विकास करू शकले नाही हेच या आकड्यांमधून स्पष्ट होते, असे शरसंधान त्यांनी केले आहे. राज्याचीच परिस्थिती बघितली तर लक्षात येईल की, हे सरकार किती पाण्यात आहे. शासकीय पदांसाठीच्या भरती प्रक्रिया रखडल्या आहेत. परीक्षांमध्ये सर्रास घोटाळे होत आहेत. वेदांता, फॉक्सकॉन यासारखे मोठे प्रकल्प राज्याबाहेर आंदण म्हणून दिले जात आहेत. तरुणांच्या बेरोजगारीशी संलग्न असे कितीतरी प्रश्न उपस्थित होत आहेत. तरुणांचे बिघडणारे मानसिक स्वास्थ्य, त्यामुळे वाढत असलेली गुन्हेगारी या समस्या तर दुर्लक्षितच आहेत. 'चारसौ पार'ची स्वप्ने पाहणाऱ्यांनी तरुणांची स्वप्ने पार चिरडून टाकली आहेत, अशी घणाघाती टीका त्यांनी केली आहे.

# संजय गायकवाडांची बंडखोरी, दोन अर्ज भरले

**बुलडाणा । प्रतिनिधी**

बारामतीमध्ये विजय शिवतारे, अमरावतीमध्ये आनंदराव अडसूळ, बच्चू कडूंनी महायुतीच्या उमेदवारांविरोधात दंड थोपटलेले असताना बुलडाण्यात थेट बंडखोरीच करण्यात आली आहे. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा ताप वाढला आहे. महायुतीमध्ये बंडाचे निशाण शिवसेनेनेच आधी रोवल्याने वातावरणही तापण्याची चिन्हे आहेत.

शिवतारे, अडसूळ यांच्या भेटी घेऊन शिंदे, फडणवीस यांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आहे. अद्याप या दोघांनीही माघार घेतलेली नाही. तोच बुलडाण्यामध्ये शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभेसाठी दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. शिंदे गटाची



अद्याप लोकसभेची यादी आलेली नाही. तरीही गायकवाडांनी अर्ज भरल्याने आता पुढे काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या जागेवरून प्रतापराव जाधव हे शिवसेनेचे खासदार आहेत. यामुळे जाधवांचे तिकिट कापले जाणार की गायकवाडांना बंडखोर घोषित केले जाणार, याच्या चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. या बंडखोरीमुळे शिवसेनेतच वर्चस्ववाद सुरू असल्याचे समोर आले आहे. गायकवाड हे राज्यात मंत्रिपदाच्या शर्यतीत होते. परंतु त्यांना गेले दीड वर्ष झुलवत ठेवण्यात आले होते. यातच भाजपा निगेटिव्ह रिपोर्टची भीती दाखवत शिवसेनेच्या जागांवर उमेदवारांना डावलत असल्याची भावना शिवसेनेच्या आमदार, नेत्यांमध्ये आहे. यामुळे गायकवाड यांच्या या खेळीमुळे खुद्द शिंदेच अडचणीत येण्याची शक्यता आहे.

गुरुवारी दुपारी गायकवाड यांनी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी, भाजपाचे नेते हजर नव्हते. शिंदे गटाचे तेथील स्थानिक नेते हजर होते. यामुळे गायकवाडांच्या बंडखोरीवर शिंदे काय कारवाई करतात, याकडेही राज्याचे लक्ष लागले आहे. गायकवाड यांनी दोन अर्ज भरल्याचे सांगण्यात येत आहे.

# अभिनेता गोविंदाचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. माजी खासदार आणि प्रसिद्ध अभिनेता गोविंदा अहुजा यांनी गुरूवारी (दि.२८) शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. माझा १४ वर्षांचा राजकीय वनवास संपला, असे गोविंदा यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत गोविंदा म्हणाले की, ''एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर अनेक विकास कामे केली आहेत. म्हणूनच आजची मुंबई ही सुंदर मुंबई दिसत आहे. मला चित्रपट सृष्टीसाठी काम करायचे आहे. गेली अनेक वर्षे मी राजकारणापासून लांब होतो; पण आता मी पुन्हा कमबॅक केल आहे. मी राजकारणात प्रामाणिकपणे काम करेन.'' मी राजकारणात परत आलो आहे. शिंदे यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली आहे. पक्ष जी जबाबदारी देईल मी पार पाडणार असल्याचेही गोविंदा यांनी स्पष्ट केले. गोविंदा यांनी २००४ लोकसभा निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर लढवली.



यावेळी ते ५०,००० मतांच्या फरकाने विजयी झाले. तथापि, नंतर त्याने आपल्या अभिनय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कार्यकाळ पूर्ण करण्यापूर्वी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला होता.

# बीड लोकसभेसाठी बाबासाहेब लंबाटे तिसऱ्या आघाडीचे उमेदवार

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

२१ घटक पक्ष मिळून तिसरी राजकीय आघाडीची दि.२३ मार्च २०२४ रोजी मुंबई येथे मुख्य संयोजक संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद संपन्न होऊन त्यामध्ये लोकसभा २०२४ च्या निवडणुकीसाठी तिसऱ्या आघाडीच्या २१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली.त्यामध्ये राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडी महाराष्ट्र राज्याचे दोन उमेदवार घोषित केले. त्यामध्ये बीड लोकसभेसाठी राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडीचे संस्थापक बाबासाहेब लंबाटे व परभणी लोकसभेसाठी सखाराम




ग्यानबा बोबडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बाबासाहेब लंबाटे यांनी बीड लोकसभा मतदार संघातील वाडी-वस्ती व गावांमध्ये संपर्क दौरे सुरू केले असून मतदारांच्या भेटी घेऊन मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत.

# खासदार श्रीकांत शिंदेंची उमेदवारी जाहीर करूनही हेमंत गोडसे गॅसवर

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी शिवसेना शिंदे गटाकडून ८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. मात्र सर्वांचेच लक्ष असलेल्या नाशिक लोकसभा मतदारसंघाचे इच्छुक उमेदवार हेमंत गोडसे यांचे पहिल्या यादीत नाव नसल्याने नाशिकच्या जागेवरून अद्यापही सस्पेन्स कायम आहे.

हेमंत गोडसे हे नाशिक लोकसभा मतदारसंघावर सलग दोन टर्म खासदार असून यंदाही ते इच्छुक आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे



यांनी नाशिक येथे झालेल्या शिवसेना मेळाव्यात नाशिक लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार हेमंत गोडसेच असतील, अशी घोषणा केली होती. श्रीकांत शिंदे यांनी घोषणा करूनदेखील हेमंत गोडसेंच्या नावाचा पहिल्या यादीत समावेश नसल्याने शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता असल्याचे दिसून येत आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघावर महायुतीच्या तीनही पक्षांनी दावा केला आहे. शिवसेना शिंदे गटाकडून हेमंत गोडसे इच्छुक आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून छगन भुजबळ तर भाजपदेखील या जागेसाठी आग्रही आहे. त्यामुळे हेमंत गोडसे यांनी तडकाफडकी मुंबई गाठली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाबाहेर हेमंत गोडसे यांनी शिवसैनिकांसह जोरदार शक्तिप्रदर्शन केले होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिकची उमेदवारी गोडसे यांनाच मिळेल, असे आश्वासन दिले होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नागरिकांनी मताधिकाराचा वापर करावा-दादासाहेब गीते

**पुणे । प्रतिनिधी**




राज्यघटनेने १८ वर्षावरील भारतीय नागरिकाला लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदानाचा अधिकार दिलेला आहे. या अधिकाराचा वापर करत अधिकाधिक नागरिकांनी लोकसभा निवडणुकीत मतदान करावे,असे आवाहन शिवाजीनगर मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गीते यांनी केले.

पंडित नेहरू सांस्कृतिक भवन येथे मतदार जनजागृतीकरिता शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व महिला बचत गटांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी रवी खंदारे, निवडणूक नायब तहसीलदार सायली धस, स्वीप समितीचे राजेंद्र मोरे, पांडुरंग महाडिक,दीपक कदम, सागर काशीद, डॉ. प्रभाकर वराडे, डॉ. नंदकुमार बोराडे,महेश मिस्त्री उपस्थित होते. श्री.गीते यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सीव्हीजील , मतदार नोंदणी करता व्होटर हेल्पलाइन, दिव्यांगांसाठी सक्षम, उमेदवारांच्या माहितीकरीत केवायसी अशा विविध मोबाईल पबाबत माहिती दिली. स्वीपच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या मतदार जनजागृतीमुळे आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी योगा प्रात्यक्षिक, पथनाट्य सादरीकरणासह 'माझे मत माझा अधिकार' या विषयावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी व महिला बचत गट सदस्य उपस्थित होते.

पालकसभेत मतदान जनजागृती मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाअंतर्गत रामोशी वाडी येथील अंगणवाडी क्रमांक ६ येथे पालकसभेत मतदान प्रक्रियेची माहिती देण्यात आली. यावेळी पालकांना मतदान प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करून मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. यावेळी सहायक निवडणूक अधिकारी दादासाहेब गीते, नायब तहसीलदार सायली धस आदी उपस्थित होते.

# चुकीच्या गटाचे रक्त दिल्याने दोन जिल्हा शल्यचिकित्सकांनी काढला निलंबनाचा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

सांगवी येथील रुग्णांना चुकीचे रक्तगट दिल्याप्रकरणी औंध जिल्हा रुग्णालयातील दोन परिचारिकेला तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. मोबाईल फोनवर संभाषणात करताना विलचित होऊन चुकीचे रक्त संक्रमण केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सकांनी दोन परिचारिकांचे तडकाफडकी निलंबन करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबतचे वृत्त प्रसिध्द होताच रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले. औंध रुग्णालयात कार्यरत असलेल्या प्रिती ठोकळ आणि शांता मकलूर अशी या दोन परिचारिकांवर तडकाफडकी निलंबनाची कारवाई केली आहे.

दत्तू सोनाजी सोनवणे आणि दगडू कांबळे यांना न्यूमोनिया झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोघांनाही श्वास घेण्यास त्रास, पायाला सूज आणि इतर समस्या होत्या. त्यांच्या हिमोग्लोबिनची पातळी सामान्यपेक्षा कमी असल्याने, दोघांनाही त्वरित रक्तसंक्रमण आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. डॉ. किरण खलाटे हे ऑन ड्युटी डॉक्टर होते, त्यांनी नर्सिंग स्टाफकडून रुग्णांना रक्त देण्याचे निर्देश दिले. संबंधित परिचारिकेने निष्काळजीपणा करत दत्तू सोनवणे यांचा रक्तगट 'ए' पॉझिटीव्ह असताना त्यांना 'बी; पॉझिटिव्ह रक्त चढवले. तर त्यांच्या शेजारील रुग्ण दगडु कांबळे यांना 'बी' पॉझिटिव्ह रक्तगट असताना 'ए' पॉझिटिव्ह रक्त चढवले. दोन्ही रुग्णांना रक्त चढवीत असताना संबंधित परिचारिका मोबाईलवर बोलत असल्याने हा निष्काळजीपणा झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. परिचारिकेच्या या गंभीर चुकीमुळे दोन्हीही रुग्णांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते.

या घटनेनंतर सिव्हिल सर्जन यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची तातडीने बैठक बोलावली. जिल्हा शल्यचिकित्सक येम्पल्ले यांनी मंगळवारी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बैठक बोलावली. या बैठकीत असे आढळून आले की, रक्तसंक्रमण करताना परिचारिका फोनवर बोलत होत्या. या निष्काळजी वर्तनामुळे रुग्णांना चुकीच्या रक्त पिशव्या देण्यात आल्या. त्यामुळे प्राथमिक तपासात परिचारिका दोषी आढळून आल्याचे निष्पन्न झाले.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) तरतुदीनूसार दोन परिचारिकेचे निलंबन करण्यात आले आहे. २६ मार्च २०२४ रोजी दोन परिचारिकेचे सेवानिलंबन कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यांना सक्षम अधिका-यांच्या पुर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच खासगी नोकरी, व्यवसाय करता येणार नाही. इतर उद्योग, व्यापार केल्याचे निदर्शनास आल्यास गैरवर्तन समजून निर्वाहभत्ता मिळण्यास अपात्र ठरवण्यात येणार आहे,असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एन.एस. येम्पल्ले यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

# भाजप कार्यकर्त्यांची 'सागर'वर होणार बैठक फडणवीस व हर्षवर्धन पाटील यांची उपस्थिती

**इंदापूर । प्रतिनिधी**





बारामती लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीमध्ये इंदापूर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांची मुंबईत शुक्रवारी (दि. २९) 'सागर' निवासस्थानी बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये हर्षवर्धन पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर देवेंद्र फडणवीस काय बोलणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघाची जागा ही महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडे गेली आहे. इंदापूर तालुक्यामध्ये अजित पवार गटाकडून भाजप नेते व कार्यकर्त्यांना खालच्या पातळीवरील भाषेमध्ये बोलून मानहानीचा प्रयत्न केला जात आहे.

या संदर्भासह इतर मुद्द्यांवर हर्षवर्धन पाटील यांची देवेंद्र फडणवीसांशी दि. २० व २५ मार्च रोजी अशी दोनदा चर्चा झाली आहे. या वेळी अंकिता पाटील ठाकरे, राजवर्धन पाटील हेदेखील उपस्थित होते. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकडे सध्या महाराष्ट्राचे नव्हे, तर देशाचे लक्ष लागून राहिले आहे. या मतदारसंघात महायुती व महाविकास आघाडीमध्ये 'काटे की टक्कर' लक्षात घेता, महायुतीचे नेते या मतदारसंघाकडे विशेष लक्ष देत आहेत. हर्षवर्धन पाटील यांना इंदापूर विधानसभेच्या मागील ४ निवडणुकांमध्ये दिलेला शब्द अजित पवार यांच्याकडून पाळला गेला नाही, याबद्दल त्यांची नाराजी इंदापूर तालुक्यातील गावोगावच्या भाजप कार्यकर्त्यांमध्ये सध्या दिसून येत आहे. इंदापूर विधानसभेची जागा भाजपकडे असावी, अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांमध्ये आहे. देशातील हाय व्होल्टेज लढत बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये होत असल्याने देवेंद्र फडणवीस व हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत इंदापूर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांच्या होणार्या या बैठकीकडे राजकीय क्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे.

# बारामती मतदारसंघासाठी सर्वाधिक मनुष्यबळ

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक यशस्वी पार पडण्यासाठी १ एप्रिलपासून ४७ हजारांपेक्षा अधिक अधिकारी-कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. चारही लोकसभा मतदारसंघांमध्ये सर्वाधिक १० हजार ६४ मनुष्यबळ हे बारामती लोकसभा मतदारसंघासाठी असणार आहे. जिल्ह्यातील एकूण ८ हजार ३८२ मतदान केंद्रांवर प्रत्येकी ४ याप्रमाणे ३३ हजार ५२८ मतदान कर्मचारी असतील. यापैकी मावळ लोकसभा मतदारसंघातील जिल्ह्यात येणार्या ३ विधानसभा मतदारसंघांत १ हजार ३३९ मतदान केंद्रांसाठी ५ हजार ३५६, पुणे- २ हजार १८ मतदान केंद्रांसाठी ८ हजार ७२, बारामती-२ हजार ५१६ मतदान केंद्रांसाठी १० हजार ६४ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघातील २ हजार ५०९ मतदान केंद्रांसाठी १० हजार ३६ कर्मचारी नियुक्त केले आहेत. जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघांत मतदानासाठी एकूण ४७ हजार ३५९ कर्मचार्यांची नियुक्ती केली आहे.

एकूण मनुष्यबळापैकी सुमारे ४० टक्के महिला कर्मचारी असून, त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व कर्मचार्यांचे लोकसभा मतदारसंघ स्तरावर यादृच्छीकीकरण करून त्यांना मतदान केंद्रावर नेमण्यात येईल. सर्व कर्मचार्यांना प्रशिक्षणादरम्यान मतदान प्रक्रियेची नीट माहिती करून द्यावी आणि निवडणूक नियमांचे कटाक्षाने पालन होईल याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी अधिकार्यांना दिल्या आहेत.मतदानासाठी नियुक्त सर्व कर्मचार्यांना संपूर्ण प्रक्रियेची माहिती व्हावी, यासाठी सविस्तर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. कर्मचार्यांना ईव्हीएमच्या प्रात्यक्षिकासह नियमांची माहिती प्रशिक्षणाद्वारे देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती केली आहे. मतदान प्रक्रियेची नियमावली, घ्यावयाची खबरदारी, ईव्हीएम हाताळण्याची पद्धत यांविषयी कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# पुण्याच्या धरणांमध्ये फक्त २८.३९ टीएमसी पाणी शिल्लक; पुढील दोन महिने पाणी संकटाची चिन्ह

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील २६ धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत (ता. २७) ५६.३१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. सध्याच्या उपयुक्त पाणीसाठ्याचं हे प्रमाण एकूण साठ्याच्या तुलनेत केवळ २८.३९ टक्के इतके अल्प आहे. हा उपलब्ध साठा गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत ३८.८८५ टीएमसीने कमी आहे.

पुरंदर तालुक्यातील नाझरे धरण कोरडे पडले असून उजनीतील उपयुक्त साठा शून्याच्या खाली गेला आहे. आतापर्यंत उजनीतील अचल (मृतसाठा) साठ्यातील १९.११ टीएमसी पाणी वापरले आहे.गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण ९५.१९ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रमाण हे ४७.९९ टक्के इतके होते. त्यामुळे यंदाचा आजअखेरचा उपलब्ध पाणीसाठा हा गेल्या वर्षीच्या तुलनेत १९.६० टक्क्यांनी कमी झाला आहे. या २६ धरणांव्यतिरिक्त टाटा समूहाच्या सहा धरणांमधील साठा वेगळा आहे. जिल्ह्यात एकूण ३२ धरणे आहेत. यापैकी सहा धरणे टाटा समूहाची व उर्वरित २६ धरणे आहेत.जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, माणिकडोह, चासकमान, पवना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवधर, भाटघर, वीर आदी प्रमुख धरणांचा समावेश आहे. सर्व प्रमुख धरणांसह जिल्ह्यातील सर्व धरणांतील मिळून एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता १९८.३४ टीएमसी इतकी आहे.

**टाटां'च्या धरणांत २१.९० टीएमसी पाणी**

टाटा उद्योग समूहाच्या धरणांमध्ये मुळशी, ठोकळवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा आणि कुंडली यांचा समावेश आहे. या सहा धरणांची एकूण साठवण क्षमता ४२.७६ टीएमसी आहे. यापैकी सध्या २१.९० टीएमसी (५१.२१ टक्के) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.प्रमुख धरणांमधील बुधवारचा साठा (टीएमसीमध्ये) टेमघर-०.३३-वरसगाव-६.६४- पानशेत-४.९६- खडकवासला-१.०८ - पवना-३.९९- चासकमान - २.६८- भामा आसखेड - ३.६५- आंद्रा - १.६४- गुंजवणी - १.६६- भाटघर - ८.०३- नीरा देवघर -४.२७ - वीर - ४.२५- माणिकडोह - १.०९- येडगाव - ०.८९- डिंभे - ५.२४ 'टाटां'च्या धरणांतील पाणीसाठा (टीएमसीमध्ये)- मुळशी - ९.१९- ठोकळवाडी - ६.९७- शिरोटा - ४.२५- वळवण - १.३४- लोणावळा - शून्य- कुंडली - ०.१५

# 'त्या' बिबट्याचा वनरक्षकावर हल्ला !

आळेफाटा : आळेफाटा (ता. जुन्नर) येथील इमारतीमध्ये मंगळवारी (दि. २६) रात्री ९ वाजता घुसलेल्या बिबट्याला बाहेर काढण्यासाठी गेलेल्या रेस्क्यू टीमवरच त्याने हल्ला केला. या हल्ल्यात आळे वनपरिक्षेत्राचे वनरक्षक जखमी झाले. जवळपास इमारतीत सव्वा तास हा थरार सुरू होता. कैलास भालेराव असे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या वनरक्षकाचे नाव आहे. बिबट्याला इमारतीमधून बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. दुसर्या बाजूने इमारतीवर चढून त्यांनी बिबट्यास खाली हुसकाविले. बिबट्या जिन्याने खाली येत असल्याचे दिसताच रेस्क्यू टीम सदस्यांनी पत्र्यावर उड्या मारल्या. त्या वेळी जिन्याने बाहेर पडण्याऐवजी बिबट्याने पत्र्यावरच झेप घेतली आणि वनरक्षक कैलास भालेराव यांच्यावर हल्ला केला. त्यानंतर पत्र्यावरून पुढे झेप घेत बाजूच्या शेतात त्याने पळ काढला.

# रोट्रॅक्ट क्लब कडून शारदाश्रमास पुस्तके देवून मदतीचा हात




पिंपरी(प्रतिनिधी) रोटरी क्लब ऑफ निगडी च्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेला विद्यार्थ्यांचा रोट्रॅक्ट क्लब ऑफ डॉ. डी. वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग मॅनेजमेंट अँड रिसर्चच्या सदस्यांनी शिरगाव येथील शारदाश्रम प्राथमिक आश्रमशाळेला पुस्तक भेट देवून एक मदतीचा हात दिला. यावेळी रोट्रॅक्ट क्लबने ६०० हून अधिक पुस्तके दान केली.

यासाठी महाविद्यालयामध्ये सुरू केलेल्या पुस्तक देणगी काउंटरवर विद्यार्थी आणि प्राध्यपकांनी स्वेच्छेने पुस्तके आणि आर्थिक निधी दान केला.

रोट्रॅक्ट क्लबच्या सदस्यांनी मुलांना मिठाई वाटप,विविध खेळ,नृत्य , गायन करणे, गोष्टी सांगितल्या. यावेळी रोट्रॅक्ट क्लबचे सल्लागार प्रा तेजश्री गुळवे, डॉ सुनीता पाटील, प्रा शिवाजी वसेकर तसेच रोट्रॅक्ट क्लबचे अध्यक्ष लौकिक मराठे, प्रांजल बनकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन बद्दल डॉ डी वाय पाटील प्रतिष्ठानचे चेअरमन सतेज डी. पाटील, अध्यक्ष डॉ संजय डी. पाटील, विश्वस्त तेजस पाटील, शैक्षणिक संकुलाचे संचालक रिअर ऍडमिरल अमित विक्रम,प्राचार्या डॉ अनुपमा पाटील , उपप्राचार्य डॉ सुनील डंभारे, कुलसचिव वाय के पाटील यांनी अभिनंदन केले.

# उदयनराजे यांना उमेदवारी जाहीर न होणे वेदनादायी : सुप्रिया सुळे



पुणे : निवडणूक लढवण अधिकार आहे,. पाचशे साडे पाचशे खासदार आहेत, यात एखादी सीट मागे पुढे होऊ शकते. जयंत पाटील जागावाटप बाबत सांगतील. मी ३६५ दिवस लोकात असते. उदयनराजे यांना उमेदवारी जाहीर न होणे ही बाब वेदनादायी आहे. त्याच्याबरोबर अनेक वर्ष काम केलं आहे. तो गादीचा अपमान आहे. पवार साहेब यांनी प्रेम दिल. छत्रपती याच नाव लागतं पण यादीमधे नाव येत नाही. भाजपा सुडाच राजकारण करत आहे. तुतारी वाजवणार माणूस सर्वासाठी आहे.. भाजपला शरद पवार यांना संपवायचा आहे. सुडाच राजकारण भाजप करत आहे. कश्मीर टू कन्याकुमारी भाजपला शरद पवारांना संपवायचा आहे. असं तेच सांगतात. त्यांना महाराष्ट्राचा विकास करायचा नाही.

# दिलीप वळसे पाटील यांचा अपघात; गंभीर दुखापतीमुळे खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार

**पुणे । प्रतिनिधी**



राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांना गंभीर दुखापत झाली आहे. वळसे पाटील यांना हात, पाय आणि पाठीला दुखापत झाल्याची माहिती समोर येत आहे. दिलीप वळसे पाटलांवर पुण्यातील औंध येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. वळसे पाटील यांची सध्या प्रकृती स्थिर आहे. मात्र त्यांच्यावर १२ ते १५ दिवस रुग्णालयात उपचार सुरु रहातील असा अंदाज वर्तवण्यात येतोय.

दिलीप वळसे पाटील यांनी एक्स पोस्ट करत ही माहिती दिली आहे. ते म्हणाले की, काल रात्री राहत्या घरात पडल्यामुळे मला फ्रॅक्चर झाले असून डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार सुरू आहेत. काही काळ पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. लवकरच बरा होऊन आपल्या समवेत सामाजिक कामात सक्रिय होईल.

काल रात्री राहत्या घरात पडल्यामुळे मला फ्रॅक्चर झाले असून डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार सुरू आहेत. काही काळ पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. लवकरच बरा होऊन आपल्या समवेत सामाजिक कामात सक्रिय होईल.

# पारितोषिक मिळणे म्हणजे गुणवत्ता सिद्ध करणे होय-स्वाती महाळंक

**पुणे । प्रतिनिधी**




जीवनात पारितोषिक मिळणे म्हणजे आपण गुणवत्ता सिद्ध करणे होय. पण ही गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी त्यात जिद्द, चिकाटीला पर्याय नाही. युवकांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमावर अधिकाधिक भर द्यायला हवा. काळाची पाऊले ओळखून येणाऱ्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊन आपल्यातील क्षमता सिद्ध करायला हव्यात,असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व निवेदिका स्वाती महाळंक यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, आधुनिक युगातील

समाजमाध्यमांच्या माध्यमातून आपला व्यक्तिमत्व विकास साधता येईल. यु-ट्युबसारख्या माध्यमाकडे युवकांनी आर्थिक स्त्रोत म्हणूनही पाहायला हरकत नाही. तथापि त्याचे तंत्र जाणून घेतले पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे होते. रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रयोगशाळा आहे. सातत्याने नाविन्याचा ध्यास हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे कौशल्याधिष्ठीत अंशकालीन अभ्यासक्रमावर भर दिला आहे. शाखाप्रमुखांनाही संस्थेने स्वातंत्र्य दिल्याने बदलत्या काळाला अनुसरून विविध क्षेत्राशी निगडित अंशकालीन अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरु झाले आहेत. त्याचा उपयोग करून अनेक विद्यार्थ्या स्वयंरोजगार सुरू करून आर्थिक सक्षम होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. 'नॅक'कडून महाविद्यालयास 'ए ++' मानांकन मिळाल्याबद्दल प्राचार्य व शिक्षकेतर सेवकांचे विशेष कौतुक केले. आणि अखेरी जीवनात यशस्वी होण्यासाठी अविरत परिश्रमाला पर्याय नाही, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रोफेसर डॉ. माधव सरोदे यांनी केले. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील विविध उपक्रम, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, वार्षिक अंक 'शाल्मली'ला मिळालेले पुरस्कार, कला, क्रीडा विभागात यशस्वी झालेले विद्यार्थी यांचा लेखाजोखा कार्याध्यक्ष उपप्राचार्य प्रा. शहाजी मोरे यांनी मांडला. कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मा. विशाल मासुळकर, सामाजिक कार्यकर्ते मा. संजय गायखे, मा. धम्मराज साळवे, प्रबोधनकार श्रीमती शारदाताई मुंडे, उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य डॉ. दत्तात्रय हिंगणे, पर्यवेक्षक श्रीमती रूपाली जाधव, मुख्याध्यापिका श्रीमती शारदाताई शेटे, डॉ. नीलकंठ डहाळे, प्राध्यापक. शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. पांडुरंग लोहोटे, प्रा. गणेश भांगरे, प्रोफेसर डॉ. भारती यादव, उपप्राचार्य प्रा. अनिकेत खत्री यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर डॉ. कामायनी सुर्वे, डॉ. सोनल बावकर यांनी केले.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तडीपार गुंडांचा शहरात वावर, चौघांना अटक; पिस्तूल, दोन कोयते जप्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि वाकड पोलिसांनी तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये दोन तडीपार गुंडांसह चौघांना अटक केली. त्यामध्ये पिस्तूल आणि दोन कोयते अशी शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तडीपार गुंडांचा शहरात वावर असल्याचे दिसून येत आहे.

आनंद नामदेव दनाने (वय ३१, रा. विद्यानगर, चिंचवड) असे पिंपरी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी आनंद याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी १२ फेब्रुवारी २०२४ रोजी दोन वर्षांसाठी पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. त्याचा तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वी तो शहराच्या हद्दीत आला असल्याची माहिती पिंपरी पोलिसांना मिळाली. आनंदला ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक कोयता आढळून आला.

विकास उर्फ विक्या अंकुश भिसे (वय २७, रा. दळवीनगर झोपडपट्टी, चिंचवड) असे चिंचवड पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. विकासला दोन नोव्हेंबर २०२३ रोजी पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. त्याचा तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वी तो शहरात आला. त्याला चिंचवड पोलिसांनी दळवीनगर येथून अटक केली. त्याच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला आहे.

वाकड पोलिसांनी माउली उर्फ ज्ञानेश्वर सुबराव पवार (वय २३, रा. पवारनगर, थेरगाव), अजय म्हस्के (रा. थेरगाव) यांना अटक केली आहे. आरोपी थेरगाव येथे पिस्तूल घेऊन थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे एक पिस्तूल आणि दोन हजार रुपये किमतीचे एक काडतूस जप्त करण्यात आले आहे. वाकड पोलीस तपास करीत आहेत.